# प्रकाशदीप

(काव्यसंग्रह)

डॉ. द्वारका गिते – मुंडे

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors www.vidyawarta.com

प्रकाशदीप (काव्यसंग्रह)

© डॉ. द्वारका गिते – मुंडे

❖ **Publisher :**

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
Limbaganesh, Dist. Beed (Maharashtra)
Pin-431126, vidyawarta@gmail.com

❖ **Printed by :**

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
Limbaganesh, Dist. Beed, Pin-431126
**www.vidyawarta.com**

❖ **Page design & Cover :**

Shaikh Jahuroddin, Parli-V

❖ **Edition:** Sep. 2021

**ISBN** 978-93-90618-41-5

❖ **Price : 199/ -**

All Rights Reserved, No part of this publication may be reproduced, or transmitted, in any form or by any means, electronic mechanical, recording, scanning or otherwise, without the prior written permission of the copyright owner. Responsibility for the facts stated, opinions expressed. Conclusions reached and plagiarism, If any, in this volume is entirely that of the Author. The Publisher bears no responsibility for them. What so ever.Disputes, If any shall be decided by the court at **Beed** (Maharashtra, India)

संस्काराचा पाठ हा
लग्नानंतर शिकले मी..

ध्येयाने होऊन प्रेरित
डॉक्टरेट मिळवली मी
माझा मलाच हेवा वाटे
उतावीळ कधी न झाले मी
अनुभवातले शहाणपण हे
लग्नानंतर शिकले मी..

शिक्षणप्रेमी होता सहवास
वाट सुलभ झाली ही
तेजोमय हे 'प्रकाश' 'दीप'
प्रगल्भ झाली 'आशा' ही
भाव मनाचे टिपताना
कृतज्ञता जपते मी..
जबाबदारीने वागायला
लग्नानंतर शिकले मी।
लग्नानंतर शिकले मी।।



## —: समर्पण :—

सळसळतं रक्त
भगवान बाबांचे भक्त
अंगी करारी बाणा
भल्याभल्यांना टक्कर देऊन
संकटातही तरुण गेला
निधड्या छातीचा हा चेला।

समाजकारण... राजकारण
वसा अखंड सेवेचा
नेतृत्वावर ठेवून विश्वास
सन्मान केला निष्ठेचा।

नाविन्यपूर्ण उपक्रमांनी
विकास केला गावाचा
उभारले शिक्षण संकुल
दीप तेवतो ज्ञानाचा।

सरळ साधा तापट स्वभाव
पण जागृत असतो विवेक भाव
अन्यायाविरुद्ध पेटून उठतात
तांदळयांचे ''सर्जेराव''।

जिल्ह्याच्याच नाही तर
राज्याच्या नकाशात
आपण व्हावे प्रतिबिंबित
''आशा''ची ही काव्य कृती
शितल अन् तात्यांना समर्पित।
शितल अन् तात्यांना समर्पित।।

## शब्द शब्दास गुंफताना...

''प्रकाश दीप'' हा माझा पहिला मराठी कविता संग्रह पुस्तक रुपाने आपल्या समोर ठेवताना मला मनस्वी आनंद होत आहे. हिंदी हा माझा अध्ययन अध्यापनाचा विषय असल्यामुळे आणि राष्ट्रभाषेप्रती असलेला आदर भाव यामुळे हिंदी भाषेतूनही अनेक कथा, लघुकथा आणि कविता मी लिहिलेल्या आहेत. त्याचाच परिणाम माझा ''स्नेहबंध'' हा कथासंग्रह आणि ''नवांकुर'' व ''स्पंदन'' हे कवितासंग्रह प्रकाशित आहेत. अनेक कविता संग्रहातून ही माझ्या कविता प्रकाशित झालेल्या आहेत.

तसं पाहिलं तर माझ्या साहित्य लेखनाची सुरुवात ही 'स्वांतत्र्य सुखाय' या उक्तीप्रमाणे झालेली आहे. मित्रपरिवार आणि आपल्या अवतीभोवतीचे सुंदर वातावरण यातून एक प्रकारची प्रेरणा आणि प्रोत्साहन मला मिळत गेले आणि लेखणीला धार चढली. सामाजिक जाणिवा उणिवा टिपताना नेमकेपणा वर बोट ठेवून त्याला काव्यबद्ध करण्याचा हा छोटासा प्रयत्न वाचकांना नक्की आवडेल हा आशावाद मला आहे.

शेती माती, स्त्रीजीवनाची व्यथा कथा, शेतकरी, शेतमजूर, ऊसतोड कामगारांच्या समस्या, ऊसतोड मजुरांचा जिल्हा म्हणून बीड जिल्ह्याची झालेली ओळख, तरुणाईला आकर्षित करणारा भौतिक झगमगाट, त्यातून निर्माण होणारे असंख्य प्रश्न, नीत नव्याने साजरे होणारे वेगवेगळे दिवस, निसर्गाची सुंदरता, त्याचे रौद्र रूप, कुटुंब विभाजन आणि आयुष्य घडवताना, शब्द, मन, ज्योत, गीत, पाऊस, फटाके, शतपावली, धागा, राग, संवेदना, आक्रोश या आणि अशा अनेक हलक्या फुलक्या कविता वाचकांसमोर, समीक्षकां समोर ठेवण्याचा हा प्रयत्न आहे.

जीवन सुख दुखाने भरलेले आहे. अनेक उतार—चढाव जीवनात येत राहतात. संघर्ष आव्हानांशी दोन हात करत आपल्या ध्येयाप्रत पोहोचणे सोपं नसलं तरी कठीण ही नसतं. गरज असते ती जिद्द, मेहनत, चिकाटी आणि प्रबळ इच्छाशक्तीची. आणि ही इच्छाशक्तीच माझ्या लेखणीला बळ देते. त्यातून नवनवीन कथा, कविता आकार घेतात आणि या कविता विश्वातून फेरफटका मारताना जो आत्मिक



## लग्नानंतर शिकले मी..

आयुष्याच्या वळणावरती
सुरु झाला नवा प्रवास
थोडी खुशी थोडा सासुरवास
अनोळखी अनेक वाटा..
पण नाही डगमगले मी
पडता—पडता सावरायला
लग्नानंतर शिकले मी..

सुन पत्नी जाऊ वहिनी
नवीन नाती जोडली मी
झाली कधी आदळाआपट
संयम ही राखला मी..
सुखासाठी दुःख विसरायला
लग्नानंतर शिकले मी..

मुलांसाठी राबले मी..
घरासाठी झिजले मी..
सण—उत्सव वृत्त उपवास
पाहुणचार ही केले मी
घराचं घरपण जपायला
लग्नानंतर शिकले मी..

मान अपमान गिळून सारा
सन्मानाने जगते मी
प्रेम द्यावे प्रेम घ्यावे
अनुभवाने शिकले मी..

कणखर होवून जगणं.. जमल असत तुला
तसा प्रयत्न ही तू का नाही केला..?
झुंजायच होतसं, झगडायच होतसं
प्रसंगी समोरच्याचा घोटायचा होतास गळा
उगाचच तू संपवलस स्वत:ला।
उगाचच तू संपवलस स्वत:ला।।



आनंद मिळतो तो सोशल मीडियाच्या माध्यमातून त्याची अनुभूती नेहमीच येत राहते. मान्यवरांच्या ज्या प्रतिक्रिया येतात तो आनंद एखाद्या पुरस्कारापेक्षा नक्कीच कमी नसतो.

''प्रकाश दीप'' हा काव्यसंग्रह जीवन ज्योत प्रज्वलित करून विचारांची नैतिकता, जीवनातील भौतिकता आणि आचरणातील सात्विकता अधोरेखित करणारा आहे, असे मला स्वत:ला वाटते. माणसांच्या भाऊगर्दीत माणसं वाचताना येणारे अनुभव, त्यातून मिळणारे संकेत, आणि ते समजून घेताना, खऱ्या— खोट्याची पडताळणी करून वास्तवाला भिडणारे, थोरामोठ्यांच्या विचारातून आलेले जीवनाचे सार आहे. प्रेरणा आहे. म्हणून मला म्हणावसं वाटतं..

समृद्ध आमचा वारसा
प्रगल्भ आमची नीती
अज्ञानाच्या अंधारात या
उजळल्या ज्ञानज्योती।

जीवनाच्या वाटेवरती
आव्हाने कित्येक होती
नवी आशा नवी उमेद
मनास खुणवत होती।

मन बावरले, मन सावरले
कधी अंतर्मुख, कधी गहिवरले
शब्द शब्दास गुंफताना
जीवन प्रकाश दीप झाले।
जीवन प्रकाश दीप झाले।।

**धन्यवाद....**

**दि.** २१/०९/२०२१ **डॉ द्वारका गिते—मुंडे**

## —: प्रस्तावना :—

'रात्रीच्या काळोखाला
सहजच भेदणारी
मंद मंद प्रकाशाची
समईतली प्रेरणा ज्योत'

तेवढून 'प्रकाशदिप' या काव्यसंग्रहाच्या कवयित्री प्रा. डॉ. द्वारका गीते मुंडे कवितेच्या प्रांतात दाखल झाल्या आहेत.स्त्री दु:खा पासून ते कोरोना पर्यंत अनेक विषय त्यांनी कवितेत मांडले आहेत. अतिशय सन्मार्गी, हळव्या व्यक्तिमत्वाच्या या कवयित्रीला सगळं जग आनंदात राहावे असे वाटते.

या खरं तर हिंदी विषयाच्या साहित्यिक अभ्यासक. हिंदीत उत्तम कविता रचणाऱ्या. ज्योतिबा आणि सावित्रीच्या वारसदार असणाऱ्या. कवितेच्या विश्वात त्यांच्याही नकळत हरवत गेलेल्या. कवितेच्या धूसर वाटांवर शब्दांचं बोट पकडून चालू लागल्या. शब्दाला शब्द गुंफत मुक्तछंदात, सरळ साधे, सोपेपणाने व्यक्त होऊ लागल्या आहेत. त्यांचा प्रवास अजून अगदीच नवा नवा आहे.

त्या लिहितात,

धाव धाव धावताना
कधी सुखापर्यंत पोहोचलो ही
पण मृगजळच जणू ते
पुढे पुढेच जात राहते
अन जीवन वार्धक्यात प्रवेश करते
स्वत:लाच कळत नाही तारुण्य कसे अन केव्हा सरते
म्हणून हे मानवा
माझे माझे सोडून दे
वर्तमान तुझाच आहे
थोडं स्वत:साठी जगून घे....

असा स्व जाणिवेचा वर्तमान घेऊन चालणाऱ्या कवितेच्या



## का संपवलस स्वत:ला

हक्क होता.. तुला ही जगण्याचा
ताठ मानेनं वागण्याचा..
डोळ्यातल्या स्वप्नांना सत्यात उतरवण्याचा
पण आंधळ्या प्रेमात मूक बधिर होत गेलीस
अन् खुणावणाऱ्या दाही दिशा कळल्याच नाही तुला..
उगाचच तू संपवलस स्वत:ला।

कुणी दाखवली तुला अवास्तव स्वप्नं
भौतिक झगमगाटातलं अघोरी जगणं
भावनेच्या भरात विसरून गेलीस
तुझ्या स्त्रीत्वाची परिसीमा..
कोण जबाबदार तुझ्या विनाशाला
उगाचच तू संपवलस स्वत:ला।

उन्माद मांडलाय इथे मस्तावल्या नजरांनी
उमलत्या कळ्यांना चुरगाळलय यांनी..
न जनाची न मनाची, जात ही हैवानांची
ओळखता नाही आल तुला
उगाचच तू संपवलस स्वत:ला।

तू ही थोडसं चुकलीस
नैतिकतेची साथ सोडून
अनैतिकतेची वाट धरलीस
मोह मायेच्या बाजारात गुरफटत गेलीस
कसं कळलं नाही गं तुला..
उगाचच तू संपवलस स्वत:ला।

## हे मानव

भविष्याचा वेध घेत
राबणारे हात अन् झिजणारं शरीर
क्षीण होवून जाते.
तेव्हा मन अगतिक होवून
भूतकाळाचा मागोवा घेते अन
नकळतपणे सारेच डोळ्यासमोर तरळते
न थकता न थांबता झिजवली ही काया
भविष्य सुखमय व्हावे म्हणून
जमवली ही माया
धाव धाव धावताना
कधी सुखा पर्यंत पोहोचलो ही
पण मृगजळच जणू ते.
पुढे पुढेच जात राहते
अन् जीवन वार्धक्यात प्रवेश करते
स्वत:लाच कळत नाही
तारुण्य केव्हा अन् कसे सरते
म्हणून हे मानवा..
माझे माझे सोडून दे
वर्तमान तुझाच आहे
थोडं स्वता:साठीही जगून घे।
थोडं स्वता:साठीही जगून घे।।



पाऊल वाटेवरून हळूहळू त्या महामार्गावरही चालू लागतील आणि त्या नंतर पुन्हा अंतरातल्या पाऊलवाटा धुंडाळतील. स्वत:चा शोध घेतील. या त्यांच्या शोधाच्या प्रवासात शिदोरी म्हणून शुभेच्छापर माझे काही शब्द त्यांच्यासाठी लिहतेय.

आपल्या रोजच्या जगण्याच्या मुळाशी वेगवेगळ्या अनुभवांच्या, वेदनांच्या रुजण्याचं एका संवेदनेत रूपांतरण होत जातं आणि या संवेदनेचं जाणिवेत रूपांतरण होत जातं. हे जाणिवेचं रूपांतरण बुद्धिशी हळुवार तादात्म्य पावतं. हे तादात्म्य जेवढं गाढं तेव्हढं अधिक तरल होत जातं आणि आपल्या आतून भावविभोर झरे झरू लागतात. हा आविष्कार पुन:पुन्हा साकारू लागतो. मग आपला आपल्याशीच मौनस्पर्शी अखंड संवाद सुरू होतो. हा असा आकाशस्पर्शी शाब्दिक यज्ञ, रस, रुप, गंध, स्पर्श यांची अनुभूती देऊ लागतो. जो कधीतरी अनावर होतो. स्वत:शी चाललेल्या या अनुभूतीचा मग आपण अनुवादही करायला लागतो. तो काव्याच्या उत्कट अनुबंधातून साकारू लागतो. कवितेच्या आकृतीबंधातून व्यक्त होऊ लागतो.

तुमच्या अनुभवांची जातकुळी, तुम्ही वाढलेलं वातावरण, परिस्थिती, तुम्हाला घडवत जाते. आपल्यावरचे बालवयात झालेले संस्कार, समाज, पर्यावरण याचाही एक सहजच संस्कार मनावर होत जातो. असंख्य गोष्टी आपण जन्माला आलेल्या क्षणापासून आपल्यात रुजलेल्या असतात. आपल्याच आतल्या एका मनानं त्यांना घट्ट धरून ठेवलेलं असतं. आपल्याही नकळत सूक्ष्म स्वरूपात चिंतन चालू असतं. हळू हळू वय वाढतं तशा बऱ्याचशा गोष्टी धूसर होतात. अदृश्य मात्र होत नाहीत. मग आजचे अनुभव आणि अंतर्मनातल्या गोष्टी यांची नकळत मन सांगड घालते आणि आजचा अनुभव त्या आतल्या खोल अंधाराला घेऊन बाहेर पडतो. म्हणून मग कविता गूढ, दुर्बोध अशा इतरांना वाटू शकतात. कारण या कविता आत्मशोधाच्या असतात. लिहिता लिहिता आत्मशोधाकडेही आपोआपच प्रवास सुरू होतो.

म्हणून तर कविता हे माध्यम वर वर जेवढं सोपं तेवढं अधिक जटिल, गुंतागुंतीचं, अलगद नजाकतीने सोडवत याचे अलवार शेले

बांधावे लागतात. यात अनेक घटक कळत नकळत कार्यरत झालेले असतात. तुमची अनुभव घेण्याची क्षमता, तुमचं चौफेर वाचन, तुमची सजगता, सावधानता आणि तुमचा रियाज किंवा साधना. तुमचं तुमच्या भावनेशी निखळ प्रामाणिक असणं. ही अर्थातच म्हणूनच ज्याची त्याची वैयक्तिक प्रक्रिया आणि प्रतिक्रिया. म्हणूनच कविता ही देखील ज्याची त्याची ज्याच्या त्याच्या कुवतीची निवळ खाजगी बाब. म्हणून तिला कोणतीही परिमाणं नं लावता ज्याच्या त्याच्या जाणिवांवर, उर्मीवर सोडून द्यावी अशी घटना.

कवी ग्रेस तर म्हणतात,'कविता म्हणजे मृगजळाचं बांधकाम'. तर रा.ग.जाधव सर म्हणतात, 'कविता म्हणजे व्यक्तिधर्माची सुंदर भाव प्रतिमा' हे वाचल्यावर लक्षात येतं मन जितकं नितळ, निर्मळ तेवढं झिरपणं जास्त. जितका अधिक झिरपा तेवढं उमलणं अधिक ते ही अधिक अधिक खोलवरून म्हणून चिंतनगर्भ होत जाणारं. मनही दर दिवसानं अधिक सकस समृद्ध होत जाणारं. मग काव्यगुण सुद्धा तसेच रसयिता होऊन वाचकाच्या मनाचा ठाव घेणारे. आत्मसंवादातून प्रसवणारे हे अंकुर मग नुसते शब्द उरत नाहीत तर नेणिवेला जाणिवेत आणताना त्या काव्याला अलौकिक गाथेचा बाज देतात. तरीही सांगायचं कितीतरी निसटून जातं. जाणिवांच्या अज्ञात गुहेतलं स्पर्शून गेलेलं काही हरवून जातं. आशयाची नेमकी मोट मग नाहीच बांधली जात शब्दांकडून. अतृप्त तहानेची असोशी जीवघेणी होऊन पुन: पुन्हा कवितेत उतरत राहते. म्हणून तर कविता कधीच पूर्ण सत्य किंवा पूर्ण काल्पनिक अशी नसतेच.

नांदूरघाट येथे राहणाऱ्या या कवयित्रीची ग्रामीण भागातल्या दु:खाशी, शेतीमातीशी जुळलेली नाळ आणि त्यातून आलेली जाणीव निसर्ग, राजकारण यावर नकळत बोट ठेवते. 'उचल' या कवितेतलं हे वर्तमानाचं गाऱ्हाणं बघूया.

'तुम्ही डिजिटल डिजिटल म्हणा
आम्ही भोगतोय दुष्काळी झळा
बागायती जिरायती सारे समसमान



## राग

मनासारख्या घडाव्यात
साऱ्याच गोष्टी..
वाटत राहतं
याला
त्याला
मला ही..
पण कळत नकळत
मनाविरुद्ध घडते अन्
तळपायाची आग मस्तकात जाते
पारावार उरत नाही
सैरभैर होऊन मन
उद्विग्न होत राही
व्यक्तिपरत्वे भिन्नता ही असते
समजत नाही काहीच
तेव्हा आत्महत्येचे खूळ
डोक्यात जावून शिरते
मरण नाहीतर मारीन
टोकाची लढाई मनात असते
क्रोधाचा आळवून राग
तयारी सुरू होते अन्
घडून जाते अघटित
भयानक अन् दु:खद
तेव्हाच मन थाऱ्यावर येते
म्हणून हे माणसा.. अविचार सोडून
सद्सद्विवेक बुद्धीने वाग।
छोट्या छोट्या गोष्टींचा
मनात धरू नको राग।।

## काळी आई

मृगाच्या सरीने
बळीराजा सुखावतो
हुरूप येतो त्याला
अन् काळ्या आईची ओठी भरतो

उदरात पडलेलं बीज
पावसाच्या सरीनं अंकुरित होते
दिसामाशी वाढत जाऊन
दिमाखात डोलत राहते

पांग फेडल्यागत हुरूप येतो मातीला
सुगंधित होऊन मोहून टाकते सर्वांना
वर्षानुवर्षे तिचं अंकुरणं
दाणे भरून रीत होणं
अविरत चालूच आहे

जीव जगताच भरण—पोषण
तिचा दिनक्रमच आहे
बळीराजाच्या मेहनतीचं
त्याला वलय लाभलं आहे
सुख—दुःखाच समीकरण जणू
काळ्या आईशी जोडलं गेलं आहे।।



पाण्यासाठी वणवण किती करणार
सहा महिने गुजराण, गुरं ढोरं जगणार
माणसंही राबणार कारखान्यावर
म्हणून बायकोशी बोलून
आलो उचल घेऊन
तुम्ही डिजिटल डिजिटल म्हणा
आम्ही भोगतोय दुष्काळी झळा।

मनाची माती निकोप असेल तर आपसूकच भावना शुद्ध शुद्ध होत प्रगल्भ होतील आणि अंतर्बाह्य माधुर्य पसरवत शब्दाशब्दातून बुद्धत्व प्रगटू लागेल. आणि सर्जनातून सामाजिक स्पंदने स्फुरू लागतील. मानव्य, कल्पना आणि सौन्दर्य यांचा सुरेख मिलाफ होत अभिजातता, स्वाभाविक सृजनाची आणि सर्जनाची उत्कट अनुभूती देईल. अशा भावस्थितीची स्पंदनं शब्दांना पार करून आशयघन प्रतिमा विश्वाचा वेध घेईल. या वाटा कवयित्रीलाही सापडो आणि तिचा प्रवास व्यक्तीतून समष्टीकडे होत जावो.

मला वाटतं चांगलं, वाईट असं मूल्यमापन नं करता कवीनं सृजन आणि सर्जन करत राहावं. काळ आपल्या कसोटीवर घासून घेत राहील. त्यालाच त्याचं काम करू दे. पुनश्च एकदा शुभेच्छा देते आणि थांबते.

**प्रिया धारूरकर**
**औरंगाबाद**

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. वंदन | — | १३ |
| २. गावू स्त्री रत्नांचे गुणगान | — | १४ |
| ३. अनामिकेच पत्र | — | १५ |
| ४. मिळून साऱ्याजणी | — | १६ |
| ५. संवाद कवितेशी | — | १८ |
| ६. अशी बोलते माझी कविता | — | १९ |
| ७. आठवणींच्या हिंदोळ्यावर | — | २० |
| ८. फुलांची नवलाई | — | २१ |
| ९. परिक्रमा मराठी महिन्यांची | — | २२ |
| १०. जीवन आनंद | — | २४ |
| ११. रांगोळी | — | २६ |
| १२. मन | — | २७ |
| १३. शब्द | — | २८ |
| १४. शतपावली | — | ३० |
| १५. कोजागिरी | — | ३१ |
| १६. जगणे उत्सव व्हावे | — | ३२ |
| १७. बैलपोळा | — | ३३ |
| १८. नदी | — | ३४ |
| १९. जागतिक महिला दिवस | — | ३५ |
| २०. स्त्रीत्वाचा परीघ | — | ३७ |
| २१. काळाच्या ओघात | — | ३८ |
| २२. सत्कर्म | — | ४० |
| २३. प्रकाश दीप | — | ४१ |
| २४. व्यथित आई | — | ४३ |
| २४. सार्थक जीवन | — | ४४ |
| २५. वात्सल्याची प्रीत | — | ४६ |
| २६. एक दिवस आईचा | — | ४७ |




## माय माऊली

शेती मातीत राबणारी
कष्टाळू माय माऊली
घामाघूम होऊन
डोईवरचा पदर सावरत
झिजवत राहते स्वत:ला
सावरत राहते संसाराला..।
आबाळ झाली स्वत:ची
तरी तक्रार नसते तिची
भल्या पहाटेच..
सुरुवात तिच्या कामाची
उगवतो तसा मावळतो
पण राबणं तिच सुरूच राहतं..।
गोठ्यातली गायी वासरं ही
पहात राहतात तिच्याकडं
कळणा कोंड्याच्या आशेनं
हिरमोड होऊ नये कधी कुणाचा
तसा प्रयत्नच असतो तिचा..।
घर शेतात राबूनही
मूल्यमापन तिच होत नाही
त्याचे ही तिला कधी
वाईट वाटत नाही
म्हणूनच तिला गृहीत धरलं जातं..।
कारण.. ती सार काही
बिनबोभाट करत राहते
शेती मातीत राबून
काळ्या आईशी एकरूप होते..।

**लोकप्रतिनिधी**

तू जनप्रतिनिधि
तू लोकप्रतिनिधी
सत्तेचा साज चढवलेला
प्रतिष्ठेच वलय पांघरलेला
तथाकथित समाजपुरूष तु
तुझी ही नियत फिरावी
मोह मायेच्या आहारी जाऊन
घरच्या लक्ष्मीची थट्टा करावी
वर्षानुवर्षे चाललेल्या अनैतिकतेची
स्वत:च कबुली द्यावी
ही कुणाची थट्टा? कुणाची मस्करी?
का केलीस अशी फसवेगिरी?
हे सारं पाहून ऐकून
सामाजिक अस्मिता जपणाऱ्यांचा
भ्रमनिरास झाला
काहीसा गोंधळ ही उडाला
कस कराव समर्थन तुझ
निषेध तरी कसा करावा
कारण.. आम्हीच निवडलय तुला
आमचा लोकप्रतिनिधी..




२७. संसारातून परमार्थाकडे — ४८
२८. मूल्यमापन — ५०
२९. आयुष्य घडवताना — ५१
३०. वाटणी — ५२
३१. ज्योत — ५३
३२. गीत — ५४
३३. एक दिवस प्रेमाचा — ५५
३४. संघर्ष मानवाचा — ५७
३५. अवकाळी — ५८
३६. शेतकऱ्यांच्या आत्महत्या — ५९
३७. ओळख बीड जिल्ह्याची — ६१
३८. दुष्काळी झळा — ६३
३९. उचल — ६४
४०. परवड — ६६
४१. संसाराच बोचकं — ६७
४२. ऐ कोरोना — ६८
४३. आम्ही मतदार — ६९
४४. कुलदिपक — ७१
४५. शून्य ते शिखर — ७३
४६. आक्रोश — ७४
४७. स्पर्धा — ७५
४८. शून्य — ७६
४९. हुंदका — ७७
५०. आघात — ७८
५१. वाली — ७३
५२. या व्यसनापायी — ८०
५३. फटाके — ८१
५४. भ्रष्टाचार — ८३
५५. माणसातला माणुस — ८४

५६. माणसं विविध ढंगाची — ८५
५७. लोकशाहीचे उत्सव पर्व — ८७
५८. वृक्षसंवर्धन — ८८
५९. पाणी — ८९
६०. प्रेमबंध — ९०
६१. मी सडक बोलते.. — ९१
६२. एक राखी — ९४
६३. कृष्ण माझा सखा — ९५
६४. ऑन लाइन — ९६
६५. हुंकार वेदनेचा — ९८
६६. आर्त हाक — ९९
६७. छंद वाचनाचा — १००
६८. रानफुलं — १०१
६९. अन्नदाता सुखी भव: — १०२
७०. सहजीवन — १०३
७१. कुटुंब — १०४
७२. मोकळा श्वास — १०६
७३. धागा — १०७
७४. देवाचिये द्वारी — १०८
७५. संवेदना — १०९
७६. लोकप्रतिनिधी — ११०
७७. माय माऊली — १११
७८. काळी आई — ११२
७९. राग — ११३
८०. हे मानव — ११४
८१. का संपवलस स्वत:ला — ११५
८२. लग्नानंतर शिकले मी — ११७



## संवेदना

सभोवती घडणाऱ्या
असंख्य घटना..
काही चांगल्या काही वाईट ही..
मन:पटलावर रेंगाळत राहतात
कित्येक दिवस
महिने अन् वर्ष ही..
पुन्हा पुन्हा घेऊन जातात
घटनेच्या मुळाशी
शोधत राहतात संदर्भ
करत राहतात तर्कवितर्क
लावत राहतात खऱ्याखोट्याचा
चांगल्या—वाईटचा हिशोब
येणाऱ्या पिढ्यांना
घेता यावा बोध म्हणून
असतो हा सारा खटाटोप
यातूनच मग लागतो
कधी नावीन्याचा शोध
उलगडत जाते रहस्य
तर कधी होते प्रताडणा
पण घडणाऱ्या घटनांमुळेच
जागृत होते संवेदना।।

## देवाचिये द्वारी

देवाचिये द्वारी उभा क्षणभरी
चपलेची माझ्या झाली की हो चोरी
शोध शोध शोधली पण गावतेय थोडी
दोष देत स्वत:ला निघालो अनवाणी
समजून देवाची अवकृपा तसाच आलो घरी
कसा हा देव.. चोरांना शिक्षा करत नाही
सन्मार्गाने वागण्याची बुद्धी देत नाही
भोळ्या भक्तांची तुला रे फिकरच नाही
दर्शनासाठी तुझ्या.. जीव अधीर होई
तू मात्र शांत निवांत गाभाऱ्यात राहतोस
भक्तांना आपल्या वाऱ्यावर सोडतोस
राग होता मनात पण समजावले स्वत:ला
शांत झाले मन तेव्हा कळून गेले..
देव देवळात नाही, देव मूर्तीत नाही
आंधळ्याची काठी भुकेलेला रोटी
याचकांच्या घरी गेलीय देवाची स्वारी
पायताणच ते असेल चोराला जरुरी
म्हणूनच तर केली असेल त्याने
माझ्या चपलेची चोरी..।।



## वंदन

वंदन जन्मभूमीला वंदन कर्मभूमीला
वाड—वडीलांना थोरामोठ्यांना।

वंदन जिजाऊ अन् सावित्रीबाईंना
त्यांच्या शस्त्र अन् लेखणीला।

वंदन शाहू—फुले—आंबेडकरांना
त्यांच्या कार्य अन् दूरदृष्टीला।

वंदन राष्ट्र झेंड्याला
हुतात्मे अन् स्वातंत्र्य सेनानींना।

वंदन शौर्य अन् साहसाला
त्यागी बलिदानी शूरवीरांना।

वंदन सत्य शिव सुंदरतेला
कलाकौशल्य अन कर्तबगारीला।

वंदन न्यायनीतीला
भक्ती—शक्ती अन् प्रीतिला।

वंदन माता पिता गुरुजनांना
संस्कार अन् संस्कृतिला
नतमस्तक त्यांच्या चरणी
त्यांच्यामुळेच जीवनास अर्थ आला।।

## गावू स्त्री रत्नांचे गुणगान

सावित्रीच्या आम्ही मुली
वारसा तिचा पुढे चालवू
आहे आम्हाला अभिमान
गाऊ स्त्रीरत्नांचे गुणगान।

देशाची उंचावली मान
इंदिराजी झाल्या स्त्री पंतप्रधान
तेजपूंज धाडसी अन् होत्या कर्तृत्ववान
आहे आम्हाला अभिमान।

कल्पनाची कीर्ति महान
साहस अन् शौर्याने होवून बेभान
अंतराळात दिला तिने प्राण
आहे आम्हाला अभिमान।

लता दीदींचा सूर छान
छेडून सप्तसुरांची तान
गायिले विश्वाचे गान
आहे आम्हाला अभिमान।

एकविसावे शतक महान
राष्ट्र झाले 'प्रतिभा'वान
हा तर स्त्रीत्वाचा सन्मान
आहे आम्हाला अभिमान।
गावू स्त्री रत्नांचे गुणगान।।



## धागा

दिसत नसला तरी
अस्तित्व असतंच त्याचं
म्हणूनच तर माळ बनते मण्याची
हार बनतात फुलांचे
जोडून ठेवणं जणू
कर्तव्यच असतं त्याचं
ताणला की तुटतो अन्
सारेच विस्कळीत होऊन जाते
नात्याची हीच रीत असते
मानलेली असोत की रक्ताची
का असोत माणुसकीची
सुख दुःखात सोबत मात्र नित्याची
किती ही आली संकट
कितीही केला माणसाने त्रागा
तरी माणसा माणसाला जोडणारा
असतो माणुसकीचा धागा..!''

## मोकळा श्वास

आपल्याच भावविश्वात हरवलेली माणसे
उसनं अवसान आणून वागतात तेव्हा
नजरेस पडतात .. उदासलेले चेहरे
केविलवाण्या नजरा..
कधी आक्रमक होऊन आपल्याच माणसांशी
तुसडेपणाने वागणारे..
मनाने पार खचलेले महाभाग
कारण .. अपेक्षांचं वाढलेल ओझं
आर्थिक—सामाजिक कुचंबना
गर्व, अहंकार आणि मीपणा
त्रस्त करून टाकतो तेव्हा..
सारेच विस्कळित होऊन जाते
म्हणून कधी मनमोकळं बोलावं
आपल्याही माणसाशी..।
कधी हसावं.. प्रसंगी रडावं
हलक कराव मनाला
थोडासा वेळ द्यावा स्वत:ला ही
योग प्राणायामाने मिळते खूप काही
जमलच तर करावी सफरही..
धुसर वातावरणातून व्हावे मुक्त
घ्यावा मोकळा श्वास ही..
तृप्त होऊन नवी नवलाई नजरेत सामावून
फिरावे परत आपल्या मूळ ठिकाणाला
नवी उमेद नवा उल्हास..
भारून टाकतो तन—मनाला।।



## अनामिकेच पत्र

तीर्थस्वरूप आई—बाबास
अनामिकेचा साष्टांग नमस्कार
गर्भातच मारण्याचा करू नका चमत्कार।

वंशाचा दिवा कुलदिपकच हवा
सोडून द्या अट्टहास हा
दोन कुळाची उद्धारक मी
हसत मुखाने करा स्वीकार।
गर्भातच मारण्याचा करू नका चमत्कार।।

छोट्याशा कळीचे होईल फुल मी
येईल बहरून दरवळेल कीर्ती ही
करा माझ्यावर तुम्ही संस्कार।
गर्भातच मारण्याचा करू नका चमत्कार।।

रोशन करील नाव तुमचे
घडवेल चमत्कार मी
म्हणून विनंती ही वारंवार
गर्भातच मारण्याचा करू नका चमत्कार।
गर्भातच मारण्याचा करू नका चमत्कार।।

## मिळून साऱ्याजणी

मिळून साऱ्याजणी
संकल्प करूया मनी
समाजातल्या विकृतींना
पायबंद घालण्याचा
निर्धार करूया मनी।

कुलदिपकाच्या मोहापायी
स्त्रीजन्माची किंमत नाही
माणसातला सैतान हा
झाला नीतिभ्रष्ट अहंकारी
अहंकाराला या संपवण्याचा
संकल्प करूया मनी।

फॅशनच्या नावाखाली
अश्लीलता ही वाढत गेली
सभ्य शालिन स्त्रीत्वाची
जाहिरात ही विपरीत झाली
संस्काराच्या तिजोरीतली
नीतिमूल्य ही हरवत गेली
या मूल्यांना जोपासण्याचा
संकल्प करूया मनी।

अंधश्रद्धेच्या अंध रूढींनी
समाजमन हे कलुषित होई
तंत्र मंत्राच्या आविष्काराने
उद्धार काही होणार नाही
विज्ञानाच्या आविष्काराला



समाजव्यवस्थेचा कुटुंब कणा
तो स्वस्थ, सुदृढ अन् ताठ राहिला पाहिजे
विचारांचे मतभेद असले तरी
समन्वयाचा भाव जपला पाहिजे।
समन्वयाचा भाव जपला पाहिजे।।

## कुटुंब

काळाच्या ओघात..
कुटुंबव्यवस्था बदलून गेली
नामशेष झाली संयुक्त कुटुंबं
विभक्त कुटुंब पध्दती रूढ झाली।

छोटासा परिवार, राजा—राणीचा दरबार
सुरू झाला दोघांचा कारभार..
आईबाप बोझ वाटू लागले
कधी वृद्धाश्रमात तर..
कधी वेगळे राहू लागले।

भौतिक झगमगाट कमालीचा वाढला
कुटुंबामध्ये मात्र दुरावा आला
औपचारिकता.. संकुचीत वृत्तीने
तर कहर केला
नको असलेला व्यवहारीपणा
रक्ताच्या नात्यातही आला।

लोकसंख्येचा विस्फोट झाला
हम दो हमारे दो, शांती से रहने दो चा
परिणाम ही जबरदस्त झाला।

कुटुंबाचा परीघ कमी होत गेला
कुठे भावाला नाही बहीण
कुठे बहिणीला नाही भाऊ
आत्या मावशीची ही वाणवा झाली।



डोळसपणाची श्रद्धा हवी
श्रद्धेला या जागवण्याचा
संकल्प करूया मनी
मिळून साऱ्याजणी।।

## संवाद कवितेशी

कवितेच्या विश्वात मी
नकळत हरवून गेले
बोलावं म्हटलं दिलखुलास
पण थोडीशी स्तब्ध झाले।

तेव्हा कविताच म्हणाली
मी मुक्तछंदी, मी स्वानंदी
आस्वाद घेऊन माझा
रसिक होतात आनंदी...।

लयबद्ध मी, तालबद्ध मी
सुर संगम होतो जेव्हा..
उमटते सुमधूर धुनही।

भाव मी, भावना मी.
सुख—दु:खाची सोबत माझी
विरही मनाची वेदना मी।

बोल ऐकून कवितेचे
कविमन चमकून गेले
भाव मनाचे शब्द झाले
सुरं होऊन गीत झाले
अंतरंग सुखावून गेले।

बोल कवितेचे सत्यात आले
छंद आनंद विरह वेदना
लेखणीचा प्रवास झाले
शब्द शब्दास गुंफताना
जीवन कविता झाले।।



## सहजीवन

सोबत आमची वीस वर्षाची
सुख—दु:खाची, आनंदाची
स्नेह—साहचर्य वाढवणारी
वाटचाल ही सहजीवनाची।

जीवनाच्या वाटेवरती
आव्हाने कित्येक होती
ओढ जीवास लावणारी
ध्येयवेडी धडपड होती।

स्वप्ने सत्यात यावी
आस मनास होती
निखाऱ्या सम धगधगणारी
संघर्षाची पायवाट होती।

संघर्ष फळास आला
कर्म मेहनतीचा संगम झाला
वाड—वडिलांचा आशीर्वाद सोबतीला
सत्कार्याचा संकल्प मनी
जीवनात भाग्योदय झाला।

आयुष्याच्या या वळणावर
का समजू नये नशीबवान स्वत:ला
रेशीमगाठी सहजीवनाच्या
'प्रकाश'मय जीवनसाथी 'आशा'ला मिळाला।।

## अन्नदाता सुखी भव:

धो धो पडती पाऊस धारा
सोसाट्याचा सुटला वारा
ढगांच्या गडगडाटांनी
आसमंत दुमदुमला सारा।

वरुण राजाची कृपा झाली
धरती सारी न्हाऊन गेली
आनंदाला उधाण आले
जीवसृष्टी सुखावून गेली।

पक्षी गाती मंजुळ गाणी
वाहू लागले नद्यांचे पाणी
सुंदर हिरवी वनराई
पाहता मन मोहून जाई।

कृपा तुझी अशीच राहो
अवकृपा नको कधी
अन्नदाता सुखी भव:
संस्कृतीचा संदेश अनादि।



## अशी बोलते माझी कविता

आजचे प्रगत नारी...
मी पणाच्या अविर्भावात
होऊ नको अहंकारी तू
ज्ञान दिल्याने ज्ञान वाढते
सूत्र साधे जाण तू
न्याय नीतीच्या संस्काराची.. ठेव जाग्रत अस्मिता
मनापासून सांगते.. अशी बोलते माझी कविता।

फॅशनच्या दुनियेत
जाऊ नको हरवून तू
इज्जत अब्रुचे काढुन धिंडवडे
अविवेकी झालीस तू
संस्काराच्या शिदोरीची.. तूच खरी संयोगिता
मनापासून सांगते.. अशी बोलते माझी कविता।

कुलदिपकाच्या मोहापायी
होऊ नको निर्दयी तू
निष्पाप जीवाची झालीस वैरीन
नतभ्रष्ट नारी तू
स्त्रीत्वाच्या सन्मानाची.. लाज राख आता
मनापासून सांगते.. अशी बोलते माझी कविता।

मंदिरातल्या दान पेटीत
टाकू नको दान तू
अडल्यानडल्यांना करून मदत
गरजवंत जान तू
इतरांच्या कमी पडू दे.. देह जिता जागता
मनापासून सांगते.. अशी बोलते माझी कविता।
अशी बोलते माझी कविता।।

## आठवणींच्या हिंदोळ्यावर

स्वच्छंदी जीवन हे फुलपाखरासम जगावे।
मनसोक्त हुंदडताना स्वत:मध्ये हरवून जावे।।

आजची भ्रांत नव्हे, उद्याची चिंता नव्हे।
मिळेल ते खाताना. मन होई तृप्त हे।।

लटके—झटके भांडण—तंटे, परि न रहावे कधी एकटे।
क्षणात बोली क्षणात अबोला, जग हे सुंदर वाटे।।

सन्मार्गी जीवन सारे, बोलघेवडे मन वेडे।
आनंदी जगणे अन् आनंद देणे।।

सरले बालपण., जबाबदारीचे भान आले।
आठवणींच्या हिंदोळ्यावर, मन सुखावून गेले ।।



## रानफुलं

सर्वदूर दिसणारी रानफुले
रंग आपले दाखवू लागले
हळुवार त्यांचे डोलणे
नजरेला मोहून गेले।

आला पाऊस पडले ऊन
तरी चिवटपणे टिकून राहतात
मातीशी असणारं नातं
प्रमाणिकपणे निभावतात।

खेड्यातली मुलं, रानातली फुलं
जरा एकसारखीच असतात
संकटे कित्येक आली तरी
कुठे ती डगमगतात?

## छंद वाचनाचा

पुस्तकांची दुनिया न्यारी
चित्र चरित्र कथा कहानी
ज्ञानाची ही अनमोल शिदोरी
कधी गावे गजल गाणी।

पुस्तकाशी होता मैत्री
जगण्याचा अर्थ कळे
तीर्थ पवित्र ज्ञानज्योतिने
दीन दुःखितांचे भाग्य उजळे।

ज्ञानाचा हा अफाट खजिना
पुस्तकांनीच समृद्ध केला
चोर लुटेरे आले गेले
नाही कुणाच्या हाती आला।

पुस्तकाशी जोडून नाते
महामानव प्रगल्भ झाले
यशोगाथा आम्हा सांगते
वाचनानेच समृद्ध केले।

म्हणून छंद जोपासू वाचनाचा
पुस्तकांशी होवू एकरूप
धडा घेवू नीति मूल्यांचा
जीवन होईल सुस्वरूप।।



## फुलांची नवलाई

जाई जुई मोगरा, सोनचाफ्याचा दरवळ सारा।
झेंडू अन् अबोलीचा, होतो सर्वत्र बोलबाला।।

चाफ्याच्या फुलांची पिंडीवर होते आरास।
प्राजक्तांच्या फुलांची सूर्योदयी होते बरसात।।

बकुळ केवडा शेवंती, रंगबिरंगी गुलाब फुलती।
शुभ्र पांढरा लाल पिवळा, काट्यावर डोलती।।

चांदीपाठ जास्वंद गणपतीला आवडती।
रातराणी निशिगंध हे, केसांमध्ये शोभती।।

रंगबिरंगी फुलांची, न्यारी ही नवलाई।
मनास वाटे प्रसन्न, गंध सर्वदूर जाई।।

## परिक्रमा मराठी महिन्यांची

चौत्र पालवी, वैशाख वणवा
जेष्ठ पौर्णिमेस वडाचा महिमा।

आषाढ वारी, विठू रायाच्या दारी
चंद्रभागेच्या तीरी वैष्णवांची मांदियाळी।

श्रावन सरी, सोनेरी ऊन
विहंगम सृष्टिला हिरवे पांघरुन।

भाद्रपदात येते, गौरी गणपतीची स्वारी
गुलालाची होते उधळन घरोघरी आरास न्यारी।

आश्विन शुद्ध बलिप्रतिपदा,
अभ्यंगस्नानाने लाभे आरोग्य संपदा।

फटाक्याची आतशबाजी, करुन लक्ष्मी पूजन
चकली, चिवडा मिष्ठान्नाचे भोजन..।

मार्गशिर्षातली चंपाषष्ठी
भरीत रोडगा, खंडेरायाच्या गोष्टी।
खारीक खोबरं, उधळून भंडार
यळकोट यळकोट जय मल्हार।

पौष महिन्यात मकर संक्रात
सौभाग्याचे लुटून वान
स्नेह सौहार्दाची होते बरसात।



## आर्त हाक

तुटले संसार ज्यांचे
मने ही तुटून गेली
मीपणाच्या अविर्भावात
मुलांची परवड झाली।

कुठे मिळाली आई
कुठे बाप सोडून गेला
अपराध काय माझा?
प्रश्न चिमुकल्यास पडला।

नजरा या जनाच्या,
करती सवाल मजला
कुणा कुणास जवाब देवू,
पोरकेपण छळते मजला।

गुदमरलो आज इथे
रस्ता शोधतो मी नवा
आर्त माझी हाक आहे
आई अन् बाबाही हवा।।
आई अन् बाबाही हवा।।

## हुंकार वेदनेचा

हरवला आनंद ज्यांचा
स्वप्न ही विरुन जावे
वेदनेचा हुंकार उरी
पंखात बळ यावे।

जगण्यासाठी 'आधार' मिळावा
निमित्त आपण होवू सारे
कुणी कुणाच्या कामी यावे
माणुसकीला फुटे धुमारे।

वेदनेशी जोडून नाते
समाजाशी होवू एकरूप
दिन दु:खितांची व्यथा समजूनी
जगणे करू या सुस्वरूप।।



माघ शिवरात्रीस शिवशंभूची आराधना
यात्रा, उत्सव मांगल्याची होते कामना।

सर्वात शेवटी फाल्गून येतो
डोंगर कपारी पळस फुलतो।
होळीच्या उत्सवाला उधान येते,
धुलीवंदनाची धमाल होते।

रंगाची करून उधळन,
सरत्या वर्षाला निरोप जातो।
नववर्षाची गुढी उभारण्या,
चौत्र पुन्हा सज्ज होतो।

मराठी महिन्यांची अशी ही परिक्रमा ।
संस्कृतिच्या विविधतेचा अनोखा महिमा।।

## जीवन आनंद

कुणी म्हणावे शापित मजला
कुणी म्हणावे पापी..
सृर्जनशीलतेचे वरदान मजला
मी सृष्टीची निर्माती।

मी सती साध्वी
मी भागी अभागी।
कर्मठ माझी जीवनगाथा
मी क्रांतिची चिन्गारी।

मी पुकार कालची
मी हूंकार उद्याचा।
विरह वेदना कवेत माझ्या
घे आनंद जीवनाचा।

मी तलवारीची धार
मी नवदुर्गेचा अवतार।
नवनिर्मितिचा ध्यास मजला
जीवन कलाविष्कार।

मी प्रेरक कथा कविता
मी मधुर सुरेल गाणी।
जीवनाच्या रंगभूमिची
मी अधुरी प्रेम कहाणी।

मी भाग्यशालिनी
मी वरददायिनी।



शांत निवांत
नाही राहता येत
उपाय काय।

वाढला ताण
ऑन लाइन सारे
मन बेभान।।

**ऑनलाइन**

ऑनलाइन
शिकणे शिकवणे
गरज झाली।

काळा नुसार
बदल घडवणे
शिकलो आम्ही।

गेली लाईट
गेले टावर तरी
हारलो नाही।

मनास आहे
ओढ नवलाईची
हौस जणू ती।

मिळावे ज्ञान
पहावे जग सारे
जिज्ञासा मनी।

पाहतो जग
मोबाइल हातात
पंचांग जणू।

मिळते ज्ञान
चांगले वाईट ही
खजिनाच की।

चंचल मन
दाही दिशा फिरून
येते परत।



भाव भक्तिची आस मजला
मी सह्यदयी जीवनदायिनी।

मी सागर सुखाचा
दुःख क्षितिजा पलिकडे।
मज्जाव त्या षडरिपूंना
जीवन आनंद चोहीकडे।
जीवन आनंद चोहीकडे।।

## रांगोळी

रंग—बिरंगी, शुभ्र पांढरी
अंगणी मी रेखाटली
भावना माझ्या मनातली
रांगोळी सुंदर नक्षीची।

कधी रेखीते पाना फुलांची
कधी रेखीते वेली—वेलींची
ठिपके ठिपके जोडताना
कधी रेखीते नक्षी मोराची।

स्वस्तिकं पद्म, लक्ष्मी पाउलं
प्रतिकं सारे शुभ कल्याण
संस्कृतिची सुंदर देन
स्वागत करण्या सजते अंगण।

आगत स्वागत, सण—उत्सव
रांगोळी घेते लक्ष वेधून
आखीव रेखीव रंगभरन
पाहून जाते मन मोहून।

अशी रांगोळी रंगबिरंगी
अंगणी मी रेखाटली
भावना माझ्या मनातली
रांगोळी सुंदर नक्षीची।
रांगोळी सुंदर नक्षीची।।



## कृष्ण माझा सखा

आदि अनादि कृष्ण सखा कलियुगात बदलला आहे
गोपिकांना छेडनं आता गंभीर गुन्हा बनला आहे
तरी संधी मिळेल तेव्हा.. कृष्ण खडा मारतोच
मी नाही त्यातला.. अशी बतावणी करून
गोपीकांना छळतोच..
मूळ स्वभाव त्याचा बदलत नाही
खट्याळपणा नाठाळपणा जातच नाही
व्यवस्थेनच त्याला लाडावून ठेवलय
मनमर्जीने वागायला लावलय
त्यात त्याचा ही नाही दोष..
गोपिकांचा ओढवून घेतो रोष
गोपिका ही आता सक्षम होवू लागल्यात
भर रस्त्यात धुलाई करू लागल्यात
प्रमाण तस कमीच आहे..
पण गोपिकांचा रुद्रावतार कमालीचा वाढला आहे
कृष्णाचा जयघोष आम्ही अष्टमीलाच करतो
'कृष्ण माझा सखा' भक्तिगीतातच गातो
प्रत्यक्षात मात्र चांगलाच प्रसाद देतो
कधी चारचौघी मिळून.. तर कधी पोलिसांकडून
कारण आदी अनादी कृष्ण सखा
कलियुगात बदलला आहे, देवत्वाच्या नावाखाली
हैवान त्याच्यात शिरला आहे।
हैवान त्याच्यात शिरला आहे।।

## एक राखी

एक राखी प्रेमाची..
पाठीराख्या भावाची।

एक राखी सन्मानाची
सीमेवरील बांधवांची।

एक राखी कृतज्ञतेची
कोरोना संघर्ष यौध्यांची।

एक राखी झाडांची..
निसर्गाच्या संवर्धनाची।

एक राखी प्राण्यांची..
स्नेह अन् सद्‌भावाची।

राखी मंगल—पवित्र धाग्याची..
बहिन भावाच्या अनमोल नात्याची।

राखी संस्कृतिच्या जपणुकीची
आदर अन् आनंद देणारी..

राखी श्रावणातल्या पौर्णिमेची।
बहिन भावाच्या अतूट प्रेमाची।।



## मन

आनंदाने सुखावून जाते
दुःखाने दुःखी होते
कधी कर्तव्यकठोर तर
प्रसंगानुरूप भाउक होते
असे हे मन असते।

स्वप्नांचे बांधून इमले
कल्पनेतही रमून जाते
क्षणात इथे क्षणात कुठे
भावविश्व पाहून येते।

मन आत्म्याचा आधार
पण वैऱ्यासारखे चिंतीत राहते
काय हवे काय नको
सारे काही तेच ठरवते।

विश्वास आत्मविश्वासाचा
मनच भक्कम पाया असते
यश—अपयशाच्या दिव्यातून
तेच व्यक्तीला तारुण नेते।

मन आत्म्याचा आवाज
त्याला ठेवावे प्रफुल्लित
नित्य करिता प्राणायाम
मन राहते उल्लासित।

**शब्द**

अंतरीचे भाव.
जेव्हा करतात दाटी
शब्द तेव्हाच फुटतो.
सहजच आपल्या ओठी।

शब्दांची किमया न्यारी
कधी पडतात भारी
गर्व अन् अहंकाराने
जिरवतात घमंड सारी।

शब्द बोलावे जपून
शब्द तोलावे मापून
मान शब्दांनीच वाढे
शब्द उच्चारावे जपून।

शब्द शब्दाला जोडता
नवा अध्याय घडतो
शब्द मायेची फुंकर
जीव जीवास जडतो।

शब्द बागेतली फुले
बंध नाजूक धाग्याचे
शब्दांच्या सुवासाने
ऋण जुळती नात्याचे।

शब्द जीवनाचे सारं
त्याला नसावी धार



फार काही सांगणार नाही
उपदेश तर मुळीच नाही
एक मात्र सुचवणार आहे..

रस्त्यावरती धावताना
मनमर्जी करू नका
निष्पाप जीवांचे घेऊन बळी
यमदूत बनू नका।
यमदूत बनू नका।।

पण माणसांच्या बेशिस्तीने
हैराण ही होते मी।

तुमच्याच रक्त मासात नहाते तेव्हा
वेदना मलाही होते..
कसं सांगू तुम्हाला
आप्तजन गेल्याचे दुःख काय असते।

रस्त्यापासून सुरुवात माझी
आज 'समृद्धी महामार्ग' होतेय
डिजिटल क्रांतीच्या युगात
योगदान माझे देतेय।

तेव्हा आपणही आपले कर्तव्य
पार पाडायला शिका..
झिंगाट होऊन चालवाला गाडी
तर बसेल मोठा धक्का।

रहदारीचे नियम साधे
सर्वांनीच पाळले पाहिजे
प्रत्येकाला पुढे जायचेच आहे
म्हणून काय वाऱ्याच्या वेगानं गेलं पाहिजे?

एवढी घाई कशापायी
जीव धोक्यात घालतो आम्ही
वेग कमी जीवनाची हमी
सहजपणे विसरता तुम्ही।

बोलायचे आहे खुप पण



सुख दुःखाच्या प्रसंगात
शब्द व्हावेत आधार।

शब्द असावे मधुर
स्नेह सौहार्दाचा सुर
जीवनाच्या वाटेवर
नवी येईल बहार।
नवी येईल बहार।।

## शतपावली

शांत—निवांत चांदण्या राती
मी शतपावली करत होते
इकडून तिकडे चालताना..
मी माझ्यातच हरवले होते।
अचानक मज भास झाला
कसलातरी आवाज कानावर आला
हळूच मागे वळून पाहिले
तिकडे कोणीच नाही दिसले
काय असेल कोण असेल
विचार चक्र सुरु झाले।
शतपावली थांबवून जाग्यावर उभी राहिले
तेव्हा माझेच प्रतिबिंब माझ्या पुढ्यात आले
झाला प्रकार मी समजून गेले
चंद्राच्या शीतल छायेत
भाव मनीचे बोलून गेले
मी दुर्गा मी आदिशक्ती
मी आधुनिक युगाची नारी
अशी कशी ग भ्याले?
भीती मनाची दूर करून
शतपावली मी करत आहे
आरोग्याचा कानमंत्र हा
नित्यनेमाने पाळत आहे।
शांत—निवांत चांदण्या रातीची
मी वाट पाहते..
चंद्रासोबत हितगुज करता
दुःख मनाचे शितल होते।
दुःख मनाचे शितल होते।।



## मी सडक बोलते

वळणा—वळणाची वाट माझी
रस्त्यामध्ये बदलून गेले
अनेकांच्या खाऊन खस्ता
मग मी सडक झाले।

मुरूम आणि दगड—गोटे
स्वरूप मात्र कच्चे होते
डांबर आले जोडीला
मग मात्र पक्की झाले।

बैलगाडी, घोडागाडी,
मोटारीचे धडधड धावणे
लाल, पिवळा, निळा दिवा
रुग्णवाहिकेचे सुसाट पळणे।

तावून—सुलाखून गेले तरी
आनंदी होते मी..
विकासाच्या प्रक्रियेचा
घटकच आहे मी।

गावं जोडली गावाला
नगराची तर शान मी
भ्रष्ट तुमच्या कार्याने
खड्डेमय ही होते मी।

भार तुमचा वेदना मला
दुःख मात्र कधीच नव्हते

## प्रेमबंध

प्रेमवीरांचे बंध मनाचे
नकळत जुळून यावे
नजरेला नजर भिडावी
मन घायाळ व्हावे।

तिचे नि माझे सूर जुळावे
झुकतो प्रेम देवते चरणी
तिला कळावे प्रेम आपले
फुले अर्पुनी करतो मनधरणी।

दरवळणाऱ्या फुलाप्रमाणे
प्रीती आपली बहरत जावी
प्रीतीच्या या वेलीवरती
खून तयाची उमटावी।

तू सखी साजणी फुल अबोली
मी तुझाच प्रेम दिवाना
बांधून घेऊ लगीन गाठी
नको आता बहाणा।

प्रेमबंध हे नात्याचे
विश्वास आणि भावनांचे
एकमेकांना समजून घेता
सार्थक व्हावे जीवनाचे।
सार्थक व्हावे जीवनाचे।।



## कोजागिरी

पौर्णिमेच्या रातीला
चंद्र आला भेटीला
लखलखाट अंगणी सारा
हर्ष मनी हा दाटला।

चंद्राच्या शीतल छायेत
उजळली शहरे गावे
उजळल्या दिशा दाही
मनेही उजळून जावी
न रहावा क्लेश काही।

गोड सुगंधी दुधाचा
आस्वाद तृप्त करून जाई
शरदाचे शुभ्र चांदणे
प्रतिबिंबित होऊन जाई।

कोजागिरी पौर्णिमेला
अंधार हरवून गेला
गुलाबी या थंडीत
चंद्र आला भेटीला।

## जगणे उत्सव व्हावे

बरसून गेल्या पाऊस धारा
आनंदाला उधाण आले
मन मोहक या हिरवळीत
पशुपक्षी सुखावून गेले।

नटली सजली वसुंधरा
झुळझुळ वाहती निर्मळ झरे
निसर्गाच्या नवलाईचे
सौंदर्य काय वर्णावे??

इंद्रधनू नभातले
पाहता मन मोहून गेले
सप्तरंगी रंगात या
ब्रह्मांड खुलून गेले।

पाहून हे नजारे
मन मनास बोले
दुर्लभ हा मानव जन्म
भाग्य आम्हास लाभले
उगीच का गातो आम्ही
निरर्थक रडगाणे??

जीवसृष्टीशी होऊन एकरूप
मनमुराद जगून घ्यावे
अहंकार सारा गळून जावा
जगणे उत्सव व्हावे।



## पाणी

पाणी कसं असतं
पाणी कसं दिसतं
पाणी असतं खळाळणार..
कधी संथपणे वाहणारं
पाणी असते पावसाचा थेंब
जीवसृष्टीला मिळालेली अनमोल देण।

पाणी नसते काळे..
नसते जांभळावाणी निळे ही
पाणी असते रंगात रंगलेले
डोळ्यांतून ओघळलेले..
तहानल्या जिवाला
तृप्त करणारे जीवनदान।

पाणी नसते शहरी, नसते ग्रामीण ही
आदिवासी ही नसते ते..
पाणी असते निर्भेळ निर्विकार
तीर्थ पवित्र अमृतधार।

पाणी नसते शिळे, नसते ताजेही
पाणी कल्पने पलीकडचे नाव
रंक असो किंवा राव
सर्वा साठीच ते जीव की प्राण
तिन्ही लोकी स्थान त्याचे
तयाविन नसे त्राण।
तयाविन नसे त्राण।।

## वृक्ष संवर्धन

पावसाळा आला झाडे लावू चला
लगबग सुरू चोहीकडे
निसर्गाचे बदलण्या रुपडे।
कारण सिमेंटची जंगलं
अन् औद्योगिकीकरणचा ध्यास
बेसुमार वृक्षतोडीने..
पर्यावरणाचा झाला ऱ्हास।
दुष्काळ अवर्षण याचीच अवकृपा
वाढले प्रदूषण जीवसृष्टीस झाला धोका
म्हणून.. साऱ्यांनीच आज
पर्यावरणाचे महत्व जाणले आहे।
बँका ऑफिस शाळा कॉलेज
लाख मोलाचे योगदान शासनाचे आहे
पण सरकारी कामाची ऐसी—तैसी
काही दिवसातच शिंकली माशी।
जळून गेली कित्येक झाडे
वळून कुणी पाहिले नाही।
पाण्याविना झाडे गेली
झाडा विना धूप वाढली।
दुष्टचक्र हे चालू राहिले
तर असंतुलन वाढत जाईल
निसर्गाच्या अवकृपेचा
मनुष्य शिकार होईल।
म्हणुन नको नुसते वृक्षारोपण
संवर्धन ही करू चला..
पावसाळा आला झाडे लावू चला
पावसाळा आला झाडे लावू चला।।



## बैल पोळा

कष्टाचा धनी शेतकऱ्याचा मित्र
सर्जा—राज्या राबराब राबतो
धन्याच्या साथीने..
काळ्याआईची सेवा करतो।

शेत बहरते शिवार फुलते
बैलही संतुष्ट होतो
शेतकरी सुखावून जातो
त्याच्या कष्टाची उतराई म्हणून
खांदे मळणीला हळद चढते
कण्या भात, गोड पाण्याची मेजवानी होते।

बैल पोळ्याच्या सणाची
न्यारीच आरास असते
झुली बाशिंग चौरगोंड.
वाजत गाजत मिरवणूक निघते
पुरणपोळीचा घास भरवून
घरधनीनं ही धन्य होते।

संस्कृतीची शिकवण ही
आम्हाला कृतज्ञ बनवते
शेतकऱ्यांच्या मित्राला आज
कष्टातुनही उसंत मिळते।
सर्वत्र बैलपोळ्याची धामधूम असते।।

## नदी

पावसाचं पाणी झऱ्याची गाणी
खळखळ करत.
नदीला जाऊन मिळतात।
आपल्याच तालात
आपल्याच नादात
येईन त्याला सोबत घेऊन
नदीपात्रात विसावतात..।
कधी काठोकाठ, कधी तुडुंब भरून
नदी पुढे पुढेच जात राहते..
कुणाची तहान भागवते
कुणाला आपल्या कवेत घेते।
मिटवून टाकते एकदाचे दु:ख दैन्य
थांबवते जीवनाचा संघर्ष..
जलदायिनी, पापनाशिनी.
नदी तीर्थाची तीर्थ बनते।
सुजलाम—सुफलाम धरतीचे
नदी मुळेच वैभव वाढते।
पण माणसांच्या प्रगतीने
नदी आज त्रस्त झाली आहे.
कारखान्यातील रसायनाने
प्रदूषणग्रस्त झाली आहे।
नदीचे पावित्र्य..
सर्वांनी जपलेच पाहिजे
कर्तव्याचे भान ठेवून
जबाबदारीने वागले पाहिजे
तरच नदी वरदहस्त ठरेल।।



## लोकशाहीचे उत्सव पर्व

लोकशाहीच्या उत्सव पर्वात
मतदार राजा ही राहतो गर्वात

कुणी विकतो स्वत:ला
कुणी होतो लाचार..
घाण टाकून स्वाभिमान
देतो आपले अमूल्य मतदान।

नको अशी लाचारी
नको आपले अवमूल्यन
मतदानाचा हक्क बजावून
लोकशाहीला देऊ बळ।

सुजान आम्ही नागरिक
करूया निर्धार मनाचा
योग्य निवडून उमेदवार
सन्मान करू लोकशाही मूल्यांचा।।

कुणी सोंगी, कुणी ढोंगी, कुणी लबाड भ्रष्टाचारी
रंगात रंगलेली.. धुंदीत झिंगलेली..
कुणी दिग्विजयी सत्ताधारी

माणसं विविध रंगाची।
माणसं विविध ढंगाची।।



## जागतिक महिला दिन

जीवन प्रवासात कित्येक दिवस येतात अन् जातात
आठ मार्चलाच महिलादिनाचे गोडवे गायले जातात।

कारण हा दिवस महिलांसाठी खरच खास आहे।
स्त्री जीवनाची व्यथा कथा विशद करणारा
आंतरराष्ट्रीय स्तरावरचा जीवन प्रवास आहे।

या प्रवासात अनेकींनी संघर्ष केला अन्
जीवनास नवा अर्थ प्राप्त झाला।
पाश्चात्य स्त्रियांच्या तुलनेत
तशा आम्ही भाग्यवानच आहोत।
ज्योतिबा अन् सावित्रीच्या वारसदार आहोत।
संविधानात मतदानाचा हक्क मिळाला म्हणून..
स्त्री पुरुष समाानतेच्या हकदार अन्
बाबासाहेबांच्या ऋणी आहोत।

चुल आणि मुल.
या परीघाबाहेरच्या मुक्त चिंतक आम्ही,
सर्वच आघाड्यांवर अग्रेसर आहोत।

समाजकारण, राजकारणाच्या हकदार आम्ही..
कुठे पर्याय तर कुठे सक्षम आहोत।
साहित्यिकांच्या मांदियाळित जीवनचरित्र रेखाटणाऱ्या
आम्हीच खऱ्या नायिका अन्
सुख—दुःखाचे गीत गाणाऱ्या गायिका आहोत।

पण संघर्ष अजून बाकी आहे

पुरुष प्रधान संस्कृतिचा हेका अजून बाकी आहे
वासनेची शिकार अन् हुंड्यापायी छळ
हेच अन्याय अत्याचाराचे मूळ आहे
स्त्री म्हणजे चरणाची दासी हे अजून खुळ आहे।

पुरूषसत्ताक समाज व्यवस्थेत स्त्री मुक्तीला थारा नाही
व्यक्ती स्वातंत्र्याची इथे पर्वाच नाही..
पण स्त्री मुक्ती म्हणजे स्वैराचार नव्हे,
पुरूषांचा अनादर नव्हे..
व्यक्तीत्वाचा सन्मान हेच या चळवळीचे गमक आहे
म्हणून नैतिकतेचे मापदण्ड सर्वांनीच पाळले पाहिजे
स्त्री पुरुष समानता आचरणातुन कळली पाहिजे।

आठ मार्च जागतिक महिला दिनाचा हाच संदेश आहे।
स्त्री मुक्तिच्या चळवळीचा हा जीवन प्रवास आहे।।



## माणसं विविध ढंगाची

माणसं विविध ढंगाची, माणसं विविध रंगाची
कुणी ज्ञानी कुणी अज्ञानी, कुणी सशक्त बलशाली
देशासाठी सर्वस्व अर्पण करणारी, कुणी त्यागी बलीदानी।

कुणी प्रेरक कुणी प्रभावी, कुणी अबोल मितभाषी
मंगल कामना करणारी, कुणी अलौकिक तपस्वी।

कुणी साधू कुणी संन्यासी, कुणी ऐहिक सुखवादी..
संसारात ही परमार्थ शोधणारी, कुणी प्रगल्भ बुद्धिवादी।

कुणी नैतिक, कुणी अनैतिक, कुणी गुणी अवगुणी..
दिल्या वचनाला जागणारी, शील संपन्न बहुगुणी।

कुणी ईमानी, कुणी बेईमानी, कुणी नैतिक न्यायाचारी..
अशांतता निर्माण करणारी, कुणी हिंसक अधर्मचारी।

कुणी अहंकारी, कुणी परोपकारी, कुणी बालिश बोलघेवडी
संसारात ही निस्वार्थ सेवेकरी, कुणी दाता कुणी दाणी।

कुणी शोषित कुणी शोषक, कुणी सह्रयी सद्वर्तनी
दीन दु:खितांचे आधारस्तंभ, कुणी सात्विक सदाचारी।

कुणी जळणारी कुणी जाळणारी, कुणी अधर्म अनाचारी..
माणसंच माणसाला छळणारी, कुणी अन्यायी अत्याचारी।

कुणी ओशाळणारी, कुणी भासवणारी, कुणी धूर्त नौटंकी..
स्वत:लाही फसवणारी, कुणी घातकी कुणी पातकी।

## माणसातला माणूस

माणसाला जेव्हा माणूस बनता येत नाही
तेव्हा तो खरच दिनदुबळा असतो
सज्जनांच्या संगतीतला
तो एक डोमकावळा असतो।

सभ्य शालीन चेहऱ्यातला
संस्कारहीन मवाली असतो
आव आणतो चांगुलपणाचा
पण भाव मात्र अविवेकाचा असतो।

नाते जोडतो विश्वासी
पण महानता टिकवत नाही
कारण विचारांची नैतिकता
अजून त्याच्यात अवतरली नाही।

म्हणून कर जोडून वंदन शारदेला
सद्बुद्धी दे अशा डोमकावळ्यांना
चारित्र्य सुसंस्कार आणि सुसंगतीचा
अर्थ कळू दे यांना।

कारण माणसातला माणुस जागायला हवा
प्रत्येक स्त्रीचा भाऊ होता नाही आले तरी..
किमान नात्याचा अर्थ कळायला हवा।
नात्याचा अर्थ कळायला हवा।।



## स्त्रीचा परिघ

सामाजिक परिघातलं
रूढीबध्द स्त्री जीवन
शोषिक उपेक्षित..
प्रथा परंपरेन बुरसटलेलं
अज्ञानाच्या अंध:कारात गुरफटून गेलेलं
आज परिघ भेदून प्रवाहात येऊ पाहत आहे
स्वत्वाची ही तिला जाणीव होत आहे
व्यवस्थेनेही स्वीकारल आहे
स्त्रीच स्त्रीपण. तीच चारचौघीतल जीवन
पण पुरुषी अहंकार डोके वर काढतोच
परस्त्रीचा आदरभाव पण
घरच्या स्त्रीचे कुठेच नको नाव..
सक्षमीकरण हवे आहे आम्हाला
पण घरातली स्त्री बाहेर नको जायला
हा दुटप्पीपणा जपतो आम्ही
स्त्रीला दुय्यमच समजतो आम्ही
इथली मानसिकता काही बदलत नाही
पण परिघ विस्तारलेली स्त्री
बंधन परंपरेत राहणार नाही
शिक्षणाचे अस्त्र अन् प्रगतीचे पंख
तिला स्वस्थ बसू देत नाही
कर्तृत्वाच्या दाहीदिशा
आज तिला खुणवत आहेत
जल थल नभी सर्वच ठिकाणी
स्त्रीत्वाचा परीघ विस्तारतो आहे
स्त्री सक्षमीकरणाचा परिणाम
काही अंशी का होईना दिसतो आहे।

## काळाच्या ओघात

काळाच्या ओघात..
समाज मनही बदलत गेले
चार भिंती बाहेरचं जग
स्त्रियांनाही कळू लागले।

शिक्षणाच्या प्रचार प्रसाराने
कर्तृत्वाच्या सीमारेषा ही विस्तारल्या
मनुवादी विचारसरणीच्या
जणू ठिकऱ्या ठिकऱ्याच उडाल्या।

ज्ञान विज्ञान तंत्रज्ञानात
स्त्री ही पारंगत झाली
अज्ञान हे दु:खाचे मूळ
विचारधारा बदलत गेली।

कला–क्रीडा अर्थनीती
अवघे अस्मान तिला
आज खुणवत आहे
स्त्री सक्षमीकरणाचे हेच फलित आहे।

पण हैवानांची वासनांधता
तिला आजही छळते आहे
निरपराध निर्भया
दिवसाढवळ्या जळते आहे।



## भ्रष्टाचार

भ्रष्टाचाराची परिसीमा वाढतच चालली आहे
नित्य नव्या घोटाळ्यांची मालिकाच बनली आहे।

भ्रष्टाचाराला संपवण्याची भाषा फक्त स्टेजवरच होते
प्रत्यक्षात मात्र टेबलाखालूनच नोट जाते।

म्हणूनच तर पांढरपेशी लोकांचा तेजीत आहे धंदा।
रक्कम दिल्या घेतल्या शिवाय होतच नाही सौदा।।

देणाऱ्याची जेव्हा मजबूरी होते,
घेणाऱ्याची शिरजोरी वाढत जाते।

म्हतारी मेल्याचे दु:ख नाही कुणाला पण
काळ ही असाच सोखावत गेला।

कारण देणे आणि घेणे हीच संस्कृती जोपासली जातेय
नाकासमोर चालणाऱ्याची नेहमीच गळचेपी होते।

भ्रष्ट लोकांची भ्रष्ट नीती अनितीला जागवते।
कुकर्माची शिक्षा भविष्यात भोगावीच लागते।

भ्रष्टाचाराची भ्रष्ट माया सुख–समाधान हिरावून घेते।
अनैतिकतेचा शाप बनून सतावत राहते।।

तेव्हा माणसाला त्याच्या
भ्रष्ट आचरणाची लाज वाटायला लागते
पण तेव्हा सारेच संपलेले असते।

भ्रष्टाचाराचा भस्मासुर खरंच संपणार आहे केव्हा?
प्रत्येक जण सदाचाराचा मार्ग अंगिकारेल तेव्हा।।

सण—उत्सव सोडून
जनमानसात आली आहे।

शह—काटशहाच्या राजकारणात
परमोच्च स्थानी पोहोचली आहे
ध्वनी अन् वायू प्रदूषणाची परिसीमा
केव्हाच ओलांडली आहे।

कारण विजयाचा जल्लोष
अन् शुभकार्याची सुरुवात
जणू काही फटाक्यांच्या
अखत्यारीतच आली आहे।।



निषेध मोर्चे मेणबत्त्या लावून
श्रद्धांजली वाहतो आम्ही
न्यायदेवता आंधळी आहे
वर्षानुवर्ष पाहतो आम्ही।
वर्षानुवर्ष पाहतो आम्ही।।

## सत्कर्म

विचारांच्या धुमश्चक्रीत
मन घालते पिंगा
सकारात्मक नकारात्मक
दोघांचा मग सुरु होतो दंगा।

सकारात्मक सतर्क होते
तर्कवितर्क टाळून विषयावर येते
नकारात्मक नकारघंटा वाजवत
धोक्याची सूचना देत राहते।

गोंधळ उडतो साराच
अस्वस्थता जाणवू लागते
पण सद्सद्विवेकबुद्धी
माणसाला जागवते।

अनुभवाने शहाणपण येते
बरं—वाईट कळायला लागते
मीपण ही गळून जाते
समन्वयाने समायोजन होते
संयम आणि शिस्त वाढीस लागते।

खळाळणारे वाहून जाते
गंगामैया संथ वाहते
जीवन हे असेच असते
विचारांचे काहूर शांत होते
सत्कर्म..
जीवनाचा आनंद द्विगुणीत करते।।



## फटाके

वर्षा ऋतूतील मेघगर्जने सारखे
फटाके फुटतात तेव्हा..
दणाणतो परिसर अन
वाढत जाते ध्वनिप्रदूषण।

नेत्यांची आगमनं अन्
शासकीय कामाचे भूमिपूजन
फटाके शिवाय कशाचेच
होत नाही सृजन।

धाडधाड होतच राहतात
तोफांचे बार
अबालवृद्धांना सहन करावा लागतो
आवाजाचा मार।

नेत्यावरील निष्ठा
अशीच उफाळून येत जाते
कामाच्या नावाने
सगळीकडेच बोंबाबोंब होते।

उद्घाटनाची कोनशिला तर
कधी नावालाच होते
मलिदा खाण्यासाठीच तर
ही धडामधूडूम असते।

फटाक्यांची आतषबाजी
आज बेगडी प्रतिष्ठा ल्याली आहे

## या व्यसनापायी

या व्यसनापायी..
नाही सुखाची चाहूल, नाही प्रेमानं बोलणं
गेले दिवस सरुन, दुःख मनात दाबून..
संसारी या जीवनात, नाही मिळाले समाधान।

या व्यसनापायी..
राब राबले हे हात, घाम गाळला उन्हात
होती उद्याची फिकिर, कुठे पसरावे हात..
लई सोसला वनवास, एकाकी या जीवनात।

या व्यसनापायी..
झाले मुलांचे ही हाल, पण नाही सोडले शिक्षण
झाले अज्ञान ही दूर, आले त्यांना शहाणपण
स्वप्न उद्याचे डोळ्यात, येते भरुनी हे मन।

या व्यसनापायी..
दुःख ठेवून उराशी, केला मनाचा निर्धार
झाले कष्टाचे चीज, स्वप्न झाले साकार..
सुख घेतले कवेत, दुःख दूर क्षितिजा पार
वाटे मनास आनंद, व्यसन झाले हद्दपार।
वाटे मनास आनंद, व्यसन झाले हद्दपार।।



## प्रकाशदीप

माणसांच्या भाऊगर्दीत
मी माणसं वाचत होते
वरवर गोड बोलणारे
लबाड ढोंगीच वाटत होते।

सकारात्मक होऊन मी
अंदाज घेऊ लागले..
छोट्या छोट्या कृतीतून
माणसं अजमावू लागले.।

अनुभवाचा परीघ वाढत गेला
नीत नवी माणसं भेटत होती.
कित्येक अनुभव संपन्न..
सहिष्णू सदाचारी होती।

जवळ दमडी नसूनही
मनाने मात्र श्रीमंत होती
फाटक्या आपल्या संसारात
रममान होती.।

चोच देणारा चाराही देतो
भाबड्या आशेवर जगणारी होती
जिद्दी काटक लढवय्यी..
काही परोपकारी होती।

वाचलेली माणसे
काही न काही शिकवून जात होती

जगण्याची प्रेरणा देत
नितीमुल्य रुजवत
जीवनातला आनंद द्विगुणित करत होती।

मनाची श्रीमंती अन्
धनाच्या श्रीमंतीचा
फरक दर्शवत होती।

माणसांच्या या भाऊगर्दीत
दुष्ट दुराचारी कमी
संतुष्ट सदाचारी माणसे
अधिक भेटले होते
विचारांची नैतिकता अन्
जीवनाचे सार पटले होते
जीवन प्रवासातले खरे
प्रकाशदीप भेटले होते ।।



## वाली

वर्षानुवर्षे रस्त्याच्या दुतर्फा
दिमाखात उभे पुराणपुरुष जणू ते..
धरतीची छाया बनवून अगदीच दिमाखात..
पण हात—पाय तोडल्यागत
अवस्था झाली अन्
ओसाड उजाड होऊन निपचीत पडली
विचार केला खूप तेव्हा कळले
विकासाच्या प्रक्रियेतला अडसर झाली ती..
म्हणून घाव घातले मुळावर संपवले एकदाचे
सजीव होती ती..
माणसांची प्रगती पहायची
इच्छा होती त्यांची ही..
पण दिवसाढवळ्या कत्तल झाली
अन् संपून गेले सारेच
नव्हताच कुणी उरला वाली!!

## आघात

प्रसंग जीवनातले
काही सुखद, काही दुःखद
शिकवून जातात खूप काही
चांगले आणि वाईट ही।

माणूस यातूनच घडत जातो
कधी अंतर्मुख होऊन
कधी उतावीळ होऊन
स्वत:ला सिद्ध करू पाहतो।

सुखाच्या मागे धावताना
कित्येकदा कोलमडतो
धडपडून उठतो..
स्वत:ला सावरतो।

कधी अस्वस्थही होतो
नात्यातला स्वार्थीपणा
परिवारातील विसंवाद
मनावर आघात करतो।।



## व्यथित आई

उच्चपदस्थ आहे मुलगा, वृध्दाश्रमात रहाते आई।
विदेशातल्या मुलाची, चातका सम वाट पाही।।

सुन ही उच्चपदस्थ, कशाचीच कमी नाही।
वाट पहाते फोनची, त्याला आठवणच येत नाही।।

एकुलता एक मुलगा त्याचा, पाळणाघरात रहातो बाई।
नातवंडाला पाहण्यासाठी, व्याकुळ होते इकडे आई।।

कधी तरी आलाच फोन, तर भरभरून बोलते आई।
सुखात रहा माझ्या राजा, बोलताना आसवं टिपते आई।।

दाटल्या हुंदक्यास, वाट मोकळी करून देई।
काय चुकले असेल माझे, उत्तर काही मिळत नाही।।

भविष्य आपले उज्वल व्हावे, घर संसार सोडले आम्ही।
शहरातल्या धावपळीत, धाव धाव धावलो आम्ही।।

संकटे कित्येक आली, हार कधी मानली नाही।
अर्ध्यावर सोडून गेला बाप, कुठे कमी पडली आई??

क्षीण झाले शरीर आता, मन हे घायाळ होई।
फेडावे पांग सारे तिचे, असे त्याला का वाटत नाही।।

व्यथित होवून आई, पुसते डोळ्यातले पाणी।
सांगू कुणास आता, जीवनाची कर्म कहानी।।

## सार्थक जीवन

जावे माणुसकीच्या गावा
गर्व अहं विकार न व्हावा
नको फक्त माझे माझे.
बोध माऊलीचा घ्यावा।

पहाटेचा गार वारा
आसमंत व्यापी सारा
मुक्त हस्ते उधळण त्याची
प्राणवायू तोचि खरा।

भक्तीचा वाहे झरा
तीर्थक्षेत्री नाना तऱ्हा
हरी वसे ह्रदयात
लहानथोर त्यासी प्यारा।

कोसळती पाऊस धारा
मंद मंद वाहतो वारा
चिंब होते जीवसृष्टी
तृप्त होई वसुंधरा।

मन प्रसन्न करा
आस सत्याची धरा
संत जनांचा उपदेश
त्याचा अंगीकार व्हावा।



## हुंदका

आघात होतात मनावर
कधी शब्दांचे..
कधी दु:खद प्रसंगांचे
कठोर होऊन सारे
सोसताना..
स्पर्शून गेला मायेचा शब्द
तर भरून येतो ऊर..
दाटून येतो अंतरीचा भाव
आणि बाहेर पडतो
अश्रूंच्या रुपाने
दाटलेला हुंदका!!

## शून्य

पद प्रतिष्ठा पैसा,
प्रिय असतो प्रत्येकालाच
पण चांगल्या—वाईट कर्माने
प्राप्त होतो एखाद्यालाच.।

पद असते काही दिवसाचे
प्रतिष्ठा कायमस्वरूपी असते
नैतिकतेचा आधार घेऊन
मानसन्मान मिळवून देते।

पैसा येतो तसा जातो
कधी ठेंगा ही दाखवतो
सर्वस्व नसतो तो कधीच
पण माणूस मोहजालात गुरफटतो।

स्वत:ला विसरून
त्याच्या मागे धावतो
पण एक दिवस..
सारेच विस्कळीत होते
पद सोडून जाते
प्रतिष्ठा एकाकी होते
आयुष्याची बेरीज वजाबाकी
करून पाहिले तर..
खाली फक्त शून्य उरते!!



नित सत्याची ही प्रतिक
गेले सांगून कित्येक
न्यायनीतीचे आचरण
जीवन होईल सार्थक।
जीवन होईल सार्थक।।

## वात्सल्याची प्रीत...

हंबरणारी गाय वेंधळी
हाक हाकली वळून पाही
गोठ्यातल्या वासरासाठी
जीव तिचा वेडा होई।

घरट्यातली चिऊताई
भुर्रर उडून वनात जाई
इकडेतिकडे शोध शोधूनी
दाणे पिलास घेऊन येई।

राब राब राबत राही
मुलांसाठी कधी थकत नाही
अवहेलना झाली तरी ही
घराचं घरपण जपते आई।

आई वात्सल्याची प्रीत
आई दिव्यातली ज्योत
प्राणी पक्षी मानव जात
आई सर्वांची अद्भुत।

आई मांगल्याचे गीत
ती असते भगवंत..
तिच्या मायेचा स्त्रोत
नाही कधीच आटत।
नाही कधीच आटत।।



## स्पर्धा

इथे तिथे सर्वत्र.
दगदग धावपळ
स्पर्धा संघर्ष अन् नुसते घोळ
साऱ्याच गोष्टी.
हव्या आहेत मनासारख्या
पण सहजासहजी
काहीच मिळत नाही कुणाला
समजावलं की पटतं मनाला
त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा हवी असते
जिद्द आत्मविश्वास अन् मेहनत
व्यक्तीला क्रियाशील बनवते
तेव्हाच काहीतरी हाताशी लागते
कधी मोठ्या प्रयत्नातून
छोटे यश मिळते
अन् जिवाची घालमेल होते
असमाधानाची छटा
चेहऱ्यावर उमटते
पण मिळाले त्यात समाधान शोधणे
स्वप्नांच्या पूर्ततेसाठी सतत धडपडणे
पुढे अन पुढेच जात राहणे
स्पर्धा इतरांशी नाही स्वत:शी करणे
सरळ साध्या आयुष्यात आनंदाने जगणे
ज्यांना हे जमले ते
स्वत:च स्वत:चे शिल्पकार ठरले।
स्वत: स्वत:चे शिल्पकार ठरले।।

## आक्रोश

विस्तारलेली शहरं, यंत्रयुगाची प्रगती..
क्षितिजापार दिसणाऱ्या गगनचुंबी इमारती।

वाजणारे कर्णकर्कश भोंगे, माणसांची सोंगे..
विविध रंगी विविध ढंगी, सारेच गगन भेदी..।

वरवरचा झगमगाट हा खुनावतो तरुणाईला..
खेचतो आपल्या मोहजालात अन् सुरू होते
अस्तित्वाची.. जीवघेणी लढाई।

देहभान विसरून, कधी लाचार होवून..
फिरत राहतात भरकटलेले चेहरे
नीतिमूल्य पायदळी तुडवत..।

आपल्याच विश्वात हरवून जातात
अघटित घडते काही तरी
तेव्हा उफाळून येतो जनमनातला आक्रोश!



## एक दिवस आईचा

केवळ एक दिवस आईचा
रुचत नाही मनाला
पण स्वार्थी या दुनियेत
कुणी सांगावे कुणाला।

कष्ट सोसले अपार तिने
मायेने वाढवले आम्हाला
का कृतघ्न होतो आम्ही
विसरतो आईच्या प्रेमाला।

घराचे गोकुळ व्हावे
नवस—सायास तिने केले
मनानेही मोठे व्हावे
संस्कार का राहून गेले?

आयुष्याच्या सांजवेळी
वृद्धाश्रमाची वेळ यावी
अगतिक ती माय माऊली
स्वप्नांची राखरांगोळी व्हावी।

एक दिवस गाऊन गोडवे
का उपकार करतो आम्ही
प्रत्येक दिवस आईचा
संस्कृती विसरतोय का आम्ही?
संस्कृती विसरतोय का आम्ही?

## संसारातून परमार्थाकडे

सोडून दे म्हटलं तरी
संसाराचा व्याप काही
सुटता सुटत नाही.
घे म्हटलं आराम तरी
धावपळ काही थांबत नाही।

सांगून तिला पटत नाही
लाचार होऊन जगणं तिला
कधीच जमलं नाही
स्वाभिमानाची लढाई ही
तिने कधी सोडली नाही।

पण मनाविरुद्ध होते तेव्हा
आकांडतांडव करत राहते
शांत बसनं जमत नाही तिला
उगीच काळजी करत राहते।

सोसलेस अपार कष्ट
म्हणून सांगणे हेचि तुला
काळानुसार बदलून घे
माझं माझ सोडून दे
हरिनाम जपणे आता
संसारातून निवृत्ती घे।



## शून्य ते शिखर

कार्यातून कर्तृत्व सिद्ध होते तेव्हा
व्यक्तित्वाला प्रतिष्ठा मिळत जाते
सर्वच स्तरातून कौतुकाचे बोल अन्
शाबासकीची थाप मिळत जाते
मेहनत फळाला येते, मोठेपण प्राप्त होते
शब्दाला किंमत अन् सहीचे महत्व कळते
नवा अर्थ, नवी प्रेरणा मिळत जाते
संकटे, अडचणी आव्हाने बनवून
स्वागताला उभ्याच असतात
पण मनही न डगमगता..
धीराने, धाडसाने आव्हाने पेलत
नीत नव्याचा स्वीकार करत सामोरे जाते
विचारांची प्रगल्भता, जाणिवेची संवेदनशीलता..
समग्रतेचे भान यातूनच येत जाते
व्यक्तिविकासातील शून्य ते शिखर
जीवन प्रवासाचे गमक ठरते..
शिखरावरून शून्याला पाहताना
अंत:करण भरून येते
शून्यातून ही शिखर गाठता येते
हेच आत्मविश्वासाची फलित असते।
हेच आत्मविश्वासाचे फलित असते।।

मुलींची पाहून निरागसता
खजिल झाली माता
तुम्हीच माझी वंशवेल
तुम्हीच कुलदीपक आता।
तुम्हीच कुलदीपक आता।।



होईल थोडा त्रास पण
सवय होऊन जाईल
संसारातून परमार्था कडे
तुलाही जाता येईल..
आयुष्याच्या या वळणावर
जगणे सार्थक होईल।।

## मूल्यमापन

आयुष्य सरळ साधं असलं तरी
कधी कधी गुंता होतच जातो
सुटता सुटत नाही तेव्हा..
माणुस मात्र हतबल होतो
कुणा कुणाला समजावं
कुणा कुणाला सांगावं
प्रत्येकजण आपलीच तऱ्हा करतो
सरळ वाट सोडून आडवाटेने निघतो
भेटतात मग चांडाळ चौकडी
आयुष्याची विस्कटून जाते घडी
संधी ही हातातून निघून जाते
पश्चातापाची वेळ येते
पण पश्चातापाचे प्रायश्चित्त
केवळ बोलण्यापुरतेच असते
गेलेली संधी पुन्हा येत नसते
म्हणून वेळीच.. संधीच सोनं करून घ्यावं
सरळ साध्या आयुष्यात नैतिकतेन जगून पहावं
पदापेक्षा प्रतिष्ठा मूल्यवान असते
म्हणून कधी स्वत:चही मूल्यमापन कराव।



## कुलदीपक

मुलाची अपेक्षा करता करता
तिसऱ्या खेपेस ही मुलगी झाली
सुकोमल सुहृदयी माता
क्षणात कठोर झाली।

काय दोष चिमुकल्या जिवाचा
समजावत होती माय मावशी
फेडतील ग पांग सारे
घे कुशीत, धर गं उराशी।

कुलदीपकाच्या मोहापायी
वृत—वैकल्य नवस सायास केले
पण मीच का अशी अभागी..
निपुत्र हे जीवन झाले।
रागावून आई बोलली
काय ही बडबड तुझी..
बघ जरा मुलींकडे
वाट धर आता समतेची।

पाहून आईचे अश्रु चिंतित मुली झाल्या
धीर मनाचा करून आईस बिलगल्या
आई नको ग तू अशी रडू..
आम्हीच बहिणी आम्हीच भाऊ
राखी एकमेकींना बांधू
दिवाळीला ही ओवाळु।

बदलून टाकू दिवस तुमचे
पण आम्हालाच मतदान टाका।

घोषणा अन् जाहिरनामे
अश्वासनांची खैरात करतील
दिल्या वचनाला किती जागले
हे मात्र विसरून जातील।

म्हणून सुजाण आम्ही मतदार
विचार करूया पक्का
मतदानाचा हक्क बजावून
बोलघेवड्यांना देवू धक्का।
बोलघेवड्यांना देवू धक्का।।



## आयुष्य घडवताना..

आयुष्य घडवताना
दग दग धावपळ नित्याचीच असते
सुखाच्या मागे धावताना
दु:खही पाठलाग करते।

जिद्द चिकाटी आणि मेहनत
यशाचे सूत्र असते
हातावरच्या हस्तरेषा
केवळ निमित्त असते।

विनासायास सहजपणे
कुणालाच काही मिळत नसते
दगडाला देव होण्यासाठी
असंख्य घाव सोसावे लागते।

आयुष्य घडवताना सुखाची हिरवळ
दु:खाचे डोंगर नात्याचा दरवळ
कर्तव्याचा सागर पार करून जावे लागते
तेव्हाच आयुष्य बहारदार होते।

## वाटणी

वाटणी केली घराची
जमीन—जुमला ही वाटला
कमाई नव्हती दमडीची
तरी वेगळा संसार थाटला।
दु:ख झाले आई बापाला
पण गोष्टी गेल्या टोकाला
वाटणी शिवाय पर्यायच नव्हता राहिलेला
म्हणून हिशोब सारा चुकता केला।
जिम्मेदारी आली अंगावर तेव्हा
वस्तुस्थितीची जाणीव झाली
आयतोबाची मग फजिती झाली।
काय करू कुठे जावू..
जीवघेणी कसरत नशिबी आली।
बरे होते संयुक्त कुटुंब
वाटणी नको होती करायला
इकडे तिकडे फिरून
मिळत होते खायला।
व्यवहाराचे ही देणेघेणे नव्हते
परस्पर वडील—भाऊ पाहत होते
कुठून ही दुर्बुद्धी सुचली
अन् घराची वाटणी केली
पश्चात्ताप होतो मनाला
समजले नाही तेव्हा काही
मनाचा गुंता वाढत गेला।
कारण घराच्या वाटणी बरोबर
प्रेमाचा हिस्सा ही वाटला गेला।
प्रेमाचा हिस्सा ही वाटला गेला।।



## आम्ही मतदार

रणधुमाळी निवडणुकांची
लोकशाहीच्या अस्मितेची
परीक्षा नेते अन् कार्यकर्त्यांची
प्रतिष्ठा पणाला राजकीय पक्षांची।

गाठी भेटी, होतील सभा
प्रचाराचा उडेल धुरळा
आम्हीच तुमचे भाग्यविधाते
दाखवून देतील कळवळा।

कुणी खातील, कुणी घेतील
दुष्काळातही होईल सुकाळ
तत्वांची करून फारकत, वाट्टेल ते करतील
कारण गळ्यात पडावी विजयाची माळ।

कुठे युती, कुठे आघाडी
अपक्षांचाही होईल बोलबोला
फोडाफोडी, करून कुरघोडी
खुर्चीवर साऱ्यांचाच डोळा।

मतभेद मनभेद हे तर नित्याचेच
जाति धर्मात फुट पाडून
लचके तुटतील लोकशाहीचे
हारलो तरी चालेल, ध्येय मात्र जिंकण्याचे।

यासाठीच ताई बाई आक्का
मामा मावशी काका

## ऐ कोरोना..

ऐ कोरोना.. तू आला अन्
साराच बट्ट्याबोळ झाला
कोलमडले वेळापत्रक
परीक्षांचा ही घोळ झाला।

शिक्षण झाले ऑनलाइन
हातात मोबाईल आला
पण ऑफलाईनच्या शाळेची
सर येत नाही याला।

ज्ञान विज्ञान तंत्रज्ञानाने
एक उत्तम पर्याय मिळाला
दूर असलो एकमेकांपासून तरी
देश—दुनियेची खबर कळते आम्हाला।

कोरोनाच्या भीतीने
गति थांबली माणसाची
अदृश्य हा जीवघेणा विषाणू
परिक्षा नको विषाची।

ऐ कोरोना खूप छळलेस बस्स आता
आवरून पसारा निघ आता
जगू दे सुखाने लहान—थोर सर्वांना
हीच प्रार्थना कर जोडून देवाला।।



## ज्योत

मंदिराच्या गाभाऱ्याला
तेजोमय करणारी
सर्वमंगल मांगल्यरुपी
भक्तीची भक्ती ज्योत..।

अज्ञानाच्या कवचकुंडला
ज्ञानवंत करणारी
शील अन् विद्वत्तेची
ज्ञानदायिनी ज्ञानज्योत..।

रात्रीच्या काळोखाला
सहजच भेदणारी
मंद मंद प्रकाशाची
समईतली प्रेरणा ज्योत..।

संसाराच्या परिसीमेला
मूर्तरूप देणारी वात्सल्य मूर्ती
माय माऊली.. प्रेमाची खाण अन्
सतत तेवणारी ज्योत..।

विचारांच्या प्रगल्भतेला
आधुनिक रूप देणारी
समता सहिष्णुतावादी
परिवर्तनाची प्रेरक ज्योत।

मुलगा कसला कुलदीपक
दोन्ही घरच्या दिव्याची
मुलगीच महान ज्योत।
मुलगीच महान ज्योत।।

## गीत

गीत प्रेमाचे, गीत विरहाचे
अंतरीच्या भावनांचे
गीत अबोल प्रीतीचे।

गीत भक्तीचे, गीत शक्तीचे
मना मनास जोडणारे
गीत अमोघ स्फूर्तीचे।

गीत इतिहासाचे, गीत संस्कृतीचे
परंपरेशी जोडणारे
गीत अभंग ओवीचे।

गीत कालचे, गीत आजचे
शब्द शब्दास जोडणारे
गीत मधुर कंठातले।



## संसाराचं बोचकं

संसाराचं बोचकं पाठीवर कडेवर घेऊन लेकरूं
रणरणत्या उन्हात लोकं गावाची वाट लागले धरू।

कोरोनाच्या महामारीने सारीच वाताहत झाली
सुटला अखेर संयम अन् स्थलांतराची वेळ आली।

शहर झाली पोरकी आता ओढ लागली गावाची
झगमगाट थांबला सारा आठवण आप्त अन् भावाची।

उणी दुनि काढली कुणी तरी जिव्हाळा अजून कायम आहे
रक्ताच्या नात्याची ओढ ही कायम आहे।

कामधंद्याच्या शोधात गाव सोडून गेलो राव
विसर पडला गावाचा धरणीमाय दे ग ठाव।

नियतीच्या दुष्टचक्रात मानव हतबल झाला आहे
विज्ञानाची गगनभरारी, संसाराचं बोचकं पाठीवरच आहे।
संसाराचं बोजकं पाठीवरच आहे।।

## परवड

कधी पाचरटाची गादी, कधी झोळी बांधियली फांदी
येते वाऱ्याची झुळूक.., बाळ लागते गं नादी..।

ऊस तोडतो बाप.., मोळी बांधते आई।
चिमुकले गोड बाळ, झोळी मधून ग पाही।

ऊन वारा पाऊस पाणी, तमा कशाचीच नाही
भरण्या पोटाची खळगी, जीव होई लाही लाही।

बाळ भुकेले तान्हेले, घेते उराशी आई।
स्वप्न उद्याचे डोळ्यात, रोज रोज पाहते आई।

आली बाई निवडणुक, आठवण साऱ्यांनाच होई।
देती सारी आश्वासने बदल काही होत नाही।

मागासले जीवन सारे, भवितव्य काही नाही।
किती गाळला घाम जरी, कर्ज फिटतच नाही।

पुरे झाली आश्वासने, उद्योगाचे बघा काही।
आमच्या सारखी परवड मुलांची होवू नाही।।



## एक दिवस प्रेमाचा

मराठमोळे सण आपले
संस्कृतीला जपले पाहिजे
प्रत्येक दिवस प्रेमाचा
आनंदाने जगले पाहिजे।

कार्याबरोबर कर्तव्य ही
नियमित पार पाडले पाहिजे
थोरामोठ्यांच्या विचारांचा
आदर्श ही घेतला पाहिजे।

विचारांचे पाश्चात्त्यिकरण
कटाक्षाने टाळले पाहिजे
संस्कृतीचे विकृतीकरण
धोका हा ओळखला पाहिजे।

उपासना ज्ञान—विज्ञानाची
काळाबरोबर चालले पाहिजे
नव्या जुन्याची घालून सांगड
नीतिमूल्ये जपली पाहिजे।

केवळ एक दिवस प्रेमाचा
चॉकलेटं अन् फुलांचा..
स्वत:च्या विश्वात हरवण्याचा
भौतिक झगमगाटात..
आंधळेपणाने जगण्याचा
स्वत:लाच फसवण्याचा..

अट्टाहास टाळला पाहिजे।

जीवन खुप सुंदर आहे
प्रत्येक दिवस अनमोल आहे
म्हणून आनंदाने जगले पाहिजे।।



तुम्ही डिजिटल डिजिटल म्हणा।
आम्ही भोगतोय दुष्काळी झळा।।

हाताला काम अन शेतीसाठी पाणी
उचलीचा खटाटोप राहणारच नाही..
मतासाठी बाता, बस झाल्या आता
मजुराचा बालेकिल्ला, मागास हा मराठवाडा
विकासाचे मॉडेल केव्हा बनणार??

तुम्ही डिजिटल डिजिटल म्हणा।
आम्ही भोगतोय दुष्काळी झळा।।
आम्ही भोगतोय दुष्काळी झळा।।।।

## उचल

तुम्ही डिजिटल डिजिटल म्हणा
आम्ही भोगतोय दुष्काळी झळा।

बागायती जिरायती सारे समसमान
पाण्यासाठी वणवण किती करणार?
सहा महिने गुजराण, गुरंढोरं जगणार
माणसं ही राबणार कारखान्यावर..
म्हणून बायकोशी बोलून..
आलो उचल घेऊन..
तुम्ही डिजिटल डिजिटल म्हणा।
आम्ही भोगतोय दुष्काळी झळा।।

आत्महत्या करावी तर पोर होतील पोरकी
बायकोची परवड.. नजरा लइ बेरकी
म्हणून विचार केला मनाशी
दिवस काढू उपाशी
अर्ध्यावरी डाव असा.. नाही सोडणार
बायकोशी बोलून आलो उचल घेऊन..
तुम्ही डिजिटल डिजिटल म्हणा।

आम्ही भोगतोय दुष्काळी झळा।।

उसाच्या फडा मधी, ऊन वारा पाऊस पाणी
थंडीमध्ये काकडती मुल बाळ तान्ही..
काय करू कसं जगू संकट हे आस्मानी
जीवनाच्या संघर्षात कोणी नाही वाली..
बायकोशी बोलून आलो उचल घेऊन..



## संघर्ष मानवाचा

संघर्ष मानवाचा स्वार्थासाठी नसावा
जे रंजले गांजले तया प्रति..
दातृत्व भाव असावा।

अपार वाढल्या जाती
धर्म ही किती वाढला
माणसाचा माणसाशी वैरभाव नसावा।
संघर्ष मानवाचा स्वार्थासाठी नसावा।।

सांडले रक्त, प्राणही किती गेले
देशाच्या अस्मितेला
शूरवीरांनी वंदन केले
देशभक्तीचा भाव तो कृतीमध्ये दिसावा।
संघर्ष मानवाचा स्वार्थासाठी नसावा।।

मी आणि माझे माझे..
अहंकाराचे घेऊन ओझे
देहभान तू हरवून गेला
आयुष्याचा शेवट का
अंधारकोठडीत व्हावा???
ऐवढा लौकिकही नसावा..
संघर्ष मानवाचा स्वार्थासाठी नसावा।

जे रंजले गांजले तया प्रति ..
दातृत्व भाव असावा।।

## अवकाळी

कसा निसर्ग कोपतो, कधी दुष्काळं पाडतो..
कधी दुष्काळं पाडतो, कधी अवकाळी धाडतो।
बिचारा बळीराजा खऱ्या अर्थाने नाडतो।

राबराबून शेतात, स्वप्न पाहतो मनात।
होत्याचे नव्हते होते अवकाळी तडाख्यात।।

फळा—फुलाच्या या बागा, जिवा परीस जपल्या।
अवकाळी तडाख्यात, धरणी समान झोपल्या।।

झाले झाले पंचनामे आले, आले अनुदान।
वाट पाहतो बळीराजा, लाभ घेती अन्य जन।।

जगाच्या पोशिंद्याची जगनियत्याला चिंता।
असा कसा हा देव, जाळी बळीची ही चिता।।

बळी मनाचा लई मोठा, नको होऊ त्याचा वैरी।
भिस्त सारी त्याच्यावर, हो त्याचा तू कैवारी।।
हो त्याचा तू कैवारी।।



## दुष्काळी झळा

दुष्काळाच्या दाहक झळा
उध्वस्त झाला शेतमळा
पाहणी करण्या आला
केंद्रीय पथकाचा दौरा।

अजब दौऱ्याने गजब केला
गेहूँ की मका?
प्रश्न शेतकऱ्यांनाच केला।

बॅटरीच्या उजेडात
दुष्काळाच्या दाहकतेचा
अनुभव त्यांना फार आला
शेतकऱ्यांचे हाल अन्
सर्वसामान्यांच्या वेदना पाहून
ऊर त्यांचा भरून आला।

पॅकेजच्या रूपाने
दाखवून देतील कळवळा
कारण जगाचा पोशिंदा
जगलाच पाहिजे
मोडून गेले शरीर तरी
कणा ताठ राहिला पाहिजे।

अन्नदाता सुखी भव
ब्रीद कृषी संस्कृतीचे
सन्मान त्याचा केला पाहिजे।

खैरात फक्त आश्वासनांची
पदरात पाडून घेती.. मतं गोरगरिबांची
एवढीच का जबाबदारी राजकारण्यांची?

हे थांबेल तेव्हाच.. जेव्हा..
वाहिल गंगा विकासाची
भूमी ही संत महंतांची
थोर विचारवंतांची..
नको ही ओळख ऊसतोड मजुरांची
व्हावी उभारणी इथे उद्योगव्यवसायाची।
हीच अपेक्षा सर्वसामान्य जनतेची।।



**शेतकऱ्यांच्या आत्महत्या**

शेतकरी आत्महत्या करतो तेव्हा
मोडून जातो संसार अन्
उघड्यावर येतो परिवार।
म्हणून विनंती ही वारंवार
नको होऊ जीवनातून हद्दपार।

जिवंतपणी नाही पण
मेल्यावर बळीराजाची किंमत होते
पुढारी अन कार्यकर्त्यांचे प्रेम उफाळुन येते
हजारातली रक्कम लाखात जाते
पण या पैशातून खरंच..
बळीराजाची स्वप्नपूर्ती होते?
म्हणून विनंती ही वारंवार
नको होऊ जीवनातून हद्दपार।

जीवन आहे अनमोल
ठरवू नको तू कवडीमोल
तू जगाचा पोशिंदा, तू सर्वांचा तारणहार
म्हणून विनंती ही वारंवार
नको होऊ जीवनातून हद्दपार।

स्वप्न अन् वास्तवाची
तुलाच खरी जान
वादळ वाऱ्याशी झुंज तुझी
परिस्थितीचे ठेवून भान
स्वत:साठी नाही किमान
परिवारासाठी तरी जगण्याचा कर निर्धार

विनंती नाही आवाहन तुला..
हो परिस्थितीवर स्वार
आत्महत्या करून
होऊ नको जीवनातून हद्दपार।
होऊ नको जीवनातून हद्दपार।।



## ओळख बीड जिल्ह्याची

भूमि ही संत महतांची
थोर विचारवंतांची..
पण वानवा इथे उद्योगधंद्याची
गाठ पडते ऊस अन् कोयत्याची
भरभराट झाली कारखानदारांची
अवहेलना ऊसतोड मजुरांची
हीच ओळख बीड जिल्ह्याची।

दसरा—दिवाळी दिवस उत्सवाचे
वेध लागतात यांना
ऊस तोडणीस जाण्याचे
गुरंढोरं, मुलबाळं..
संगे सारेच चंबू गबाळ
घेवून निघाली पाठीवर
बिऱ्हाड ही विंचवाची..
ओळख ही बीड जिल्ह्याची।

ऊसतोड मजूर म्हणून होतो अवमान
कोण देतो मान अन् कोण करी सन्मानं..?
फड अन् कोयत्याची घेऊन आणं
करतात जिवाचे रान
दुष्काळाची छाया अन् मुकादमाची माया
परिसीमा यांच्या शोषणाची
ओळख ही बीड जिल्ह्याची।

रणधुमाळी निवडणुकांची
आठवण तेव्हाच होते ऊसतोड मजुरांची